समावेशित शिक्षणाकडून शिक्षणाकडे...

# समावेशित शिक्षण सक्षमीकरण विभाग

## - दिव्यांग मुलं -

## अध्ययन अध्यापन प्रक्रिया

(शिक्षक मदत पुस्तिका)

## इ.१ ली ते ५ वी

## विषय :- भाषा / गणित

गट : अ



सन २०२२ - २३

**जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे**

| | | |
|---|---|---|
| **प्रवर्तक** | : | शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन |
| **प्रकाशक** | : | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे |
| **प्रेरणा** | : | मा.रणजितसिंह देओल (भा.प्र.से.)<br>प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र राज्य |
| | : | मा.सुरज मांढरे (भा.प्र.से.)<br>आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे |
| | : | मा. कैलास पगारे (भा.प्र.से.)<br>राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई |
| | : | मा. कौस्तुभ दिवेगावकर (भा.प्र.से.)<br>संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण, महाराष्ट्र, पुणे |
| | : | मा. जलज शर्मा (भा.प्र.से.)<br>जिल्हाधिकारी, धुळे |
| | : | मा. भुवनेश्वरी एस. (भा.प्र.से.)<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे |
| | : | मा. राकेश साळुंखे,<br>शिक्षणाधिकारी (प्राथ.) जिल्हा परिषद, धुळे. |
| **संपादक तथा संपादन**<br>**व प्रमुख मार्गदर्शक** | : | डॉ. मंजुषा क्षीरसागर<br>प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे |
| **संपादन सहाय्य** | : | डॉ. गिरीष बोरसे, अधिव्याख्याता-समावेशित शिक्षण विभाग प्रमुख<br>श्रीम. हर्षला गिरणार, समावेशित शिक्षण साधनव्यक्ती, म.न.पा.धुळे. |
| **विशेष सहकार्य** | : | मा. भिमराव देवरे, जिल्हा समन्वयक, धुळे. |
| | : | मा. भिकन बोरसे, जिल्हा समन्वयक, धुळे.<br>मा. सचिन पिंगळे, जिल्हा समन्वयक, धुळे.<br>मा. एजाजखान खानजी खान पठाण, म.न.पा. समन्वयक, धुळे. |
| **पुस्तक निर्मिती व**<br>**लेखन** | : | श्रीम. हर्षला गिरणार, समावेशित शिक्षण साधनव्यक्ती, म.न.पा.धुळे.<br>श्री. पंडित कढरे, समावेशित साधनव्यक्ती, ग.सा.के.पं.स., ता. शिंदखेडा, जि.धुळे<br>सौ. शुभांगी बनछोड, विशेष शिक्षक, समूह क्र.६, म.न.पा., धुळे.<br>श्री. तेजेश सोनवणे, विशेष शिक्षक, समूह क्र.८, म.न.पा., धुळे.<br>श्रीम. क्रांती शिवदास पाटील, विशेष शिक्षक, ग.सा.के.पं.स.,ता. साक्री, जि.धुळे<br>श्रीम. रोहिणी साळुंखे, विशेष शिक्षक, ग.सा.के.पं.स.,ता. शिरपूर, जि.धुळे |
| **फोटो संकलन** | : | श्री. विजय पाटील, विशेष शिक्षक, समूह क्र.१, म.न.पा., धुळे. |
| **प्रकाशन वर्ष** | : | २०२२-२३ |
| **अर्थसहाय्य** | : | प्रोग्राम ॲण्ड ॲक्टिव्हीटी अंतर्गत शासनाकडून उपलब्ध निधीतून मोफत वितरणासाठी |
| **मुद्रक** | : | का. स. वाणी, धुळे |

# प्रस्तावना

शिक्षक मित्र मैत्रिणींनो नमस्कार !

शिक्षण क्षेत्रात कार्य करणाऱ्या सर्वच घटकांमध्ये आता नक्कीच समावेशित शिक्षणाबाबत जाण निर्माण झाली आहे. तसेच प्रत्येक मूल त्याच्या गती, आवड, क्षमता, कौशल्याच्या आधाराने शिकते असा विश्वास आपल्यामध्ये निर्माण होत आहे. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेतील समावेशित शिक्षण विभागातील जिल्हा समन्वयक, विशेष तज्ज्ञ व विशेष शिक्षक यांच्या मदतीने दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक कार्य केले जाते. तसेच जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागातील समग्र शिक्षा अभियानाकडून आधारभूत सोयी सुविधांसाठी प्रशासकीय कार्य केले जाते आहे.

प्रस्तुत पुस्तिका लेखनाच्या वेळी धुळे जिल्ह्यातील २१ दिव्यांग प्रकाराचे विद्यार्थी शिक्षण प्रक्रियेत यावेत, त्यांना सामावून घेत शिकते करावे या दृष्टीने २१ दिव्यांग प्रकारातील विद्यार्थ्यांची ढोबळ वर्गवारी केली आहे. त्यांना 'अ', 'ब', 'क' गटात विभागले आहे. गटानुसार अध्ययन शैली लक्षात घेऊन इयत्ता १ली ते ५ वी च्या पाठ्यक्रमात अनुकुलन करून अध्ययन निष्पत्तीनुसार अध्ययन अनुभवांची रचना केली आहे. भाषा, गणित विषयांच्या अध्ययन अनुभवांचे एकत्रिकरण करून पुस्तिकेची निर्मिती करण्यात आली आहे.

पुस्तिकेतील अध्ययन-अनुभव दिव्यांग विद्यार्थ्यांना शिकते करण्याचा एक उदाहरणादाखल नमुना आहे. आमची अपेक्षा शिकण्याची प्रकिया समजून घेणे आहे. परिणामी शाळेत येणारे आणि शाळेत येण्यास अक्षम असणारे विद्यार्थी त्यांच्या परीने शिकण्याचा प्रयत्न करतील असा विश्वास आहे.

इ.१ ली ते ५ वीच्या विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना अध्यापन करतांना शिक्षकांना पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान विषयाच्या अध्यापनाविषयी निश्चीतच मार्गदर्शन होईल. विशेष गरजा असणाऱ्या प्रत्येक मुलास गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा हक्क मिळवून देण्यास आपण सर्व कटिबद्ध आहोत यात मात्र शंकाच नाही. त्यामुळे आपण सर्वच जण आनंदाने शिकवूया. खऱ्या अर्थाने समावेशन वर्गामध्ये रुजवूया. शिक्षकांच्या समावेशित वर्ग करण्याच्या धडपडीला ही पुस्तकरूपी साथ आहे.

पुढील शैक्षणिक कार्यास शुभेच्छा!

धन्यवाद...

**डॉ. मंजुषा क्षीरसागर**
प्राचार्य,
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे.

# मनोगत

बालकाचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९, दि. १ एप्रिल २०१० पासून अंमलात आला आहे. तसेच दि. २८ डिसेंबर २०१६ रोजी केंद्रशासनाद्वारे Right of Person with Disability (RPWD) Act, 2016 अंमलात आला आहे. या अधिनियमातील प्रकरण ३, कलम १६ व १७ व प्रकरण ६ कलम ३१ व ३२ मध्ये RTE Act, 2009 चा संदर्भ नमूद करून विशेष गरजा असणाऱ्या बालकांमध्ये कोणताही भेदभाव न करता दिव्यांगांच्या २१ प्रकारातील विशेष गरजा असणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना समावेशित शिक्षणाकडून शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणावयाचे आहे. त्या अनुषंगाने विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांचे परिणामकारक अध्ययन होण्यासाठी अध्ययन शैलीनुसार सुलभक म्हणून वर्गशिक्षकांनी/विशेष शिक्षकांनी अध्यापन करण्याची गरज आहे आणि मूल्यमापन देखील विविध अध्ययन शैलीनुसार असणे आवश्यक आहे.

प्रस्तुत कृती पुस्तिकेद्वारे वर्गशिक्षक/विशेष शिक्षक यांना त्यांच्या अध्यापनात महत्त्वपूर्ण भूमिका निभावण्यासाठी मदत होईल यात शंका नाही. दिव्यांगांच्या २१ प्रकारांचे, अध्ययन शैली निहाय व गटनिहाय (अ, ब, क) वर्गीकरण करून दिव्यांग विद्यार्थ्यांना करावयाचे अध्यापन, उपयुक्त शैक्षणिक साधने, सुयोग्य मूल्यमापन पद्धती/ तंत्रे याचे उत्कृष्ट सुलभन करण्यात आले आहे. त्यामुळे समावेशित शिक्षण विभागात/ शिक्षण विभागात कार्यरत सर्वांनी या कृतिपुस्तिकेचा उपयोग आपल्या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या अध्ययन अध्यापनासाठी करावा ही अपेक्षा, या कार्यासाठी आपणा सर्वांना शुभेच्छा!

**डॉ. गिरीष बोरसे**
समावेशित शिक्षण
सक्षमीकरण विभाग
प्रमुख तथा अधिव्याख्याता
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे.

# समावेशित शिक्षण
# गट (अ )

भारतीय राज्य घटनेने प्रत्येकास शिक्षण घेण्याचा घटनासिद्ध अधिकार प्रदान केलेला आहे. त्या अनुषंगाने प्रत्येक बालकास जवळच्या शाळेत प्रवेशित केले जाते व याप्रक्रियेत कोणत्याही प्रकारचा भेदभाव केला जात नाही. शाळेत प्रत्येक घटकातील बालकांचा समावेश होतो याच न्यायाने सामान्य विद्यार्थ्यांसोबतच विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांचा देखील होतो.

समावेशित शिक्षण म्हणजे सर्वासाठीचे शिक्षण जसे सर्व सामान्य विद्यार्थ्यांप्रमाणे विशेष गरजा असणाऱ्या बालकांचे शिक्षणाच्या मूळ प्रवाहात खऱ्या अर्थाने समावेश होणे व टिकवून ठेवणे होय.

सन २००९ चा बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा कायदा (RTE) चा हक्क ४ ऑगस्ट २००९ रोजी अधिनियमित केला गेला आहे. ज्यात ६ आणि त्या वयोगटातील मुलांसाठी मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाच्या महत्त्वाची रूपरेषा आहे. हा कायदा सर्वसामान्य मुलांसाठी ६ ते १४ तसेच दिव्यांग मुलांकरिता ६ ते १८ वयोगटातील प्रत्येक मुलाचा शिक्षणाचा मूलभूत अधिकार आहे.

**विशेष बालक/ दिव्यांग बालक (CWSN)**

विशेष गरजा असणारे बालक म्हणजे शारीरिक, मानसिक अथवा बौद्धिकदृष्ट्या काही प्रमाणात असणाऱ्या न्यूनतेमुळे विशिष्ट गरजा असणारे बालक होय.

**विशेष गरजा असणाऱ्या / दिव्यांग बालकांचे २१ प्रवर्ग खालील प्रमाणे**

१) अंधत्व (BLINDNESS)
२) अंशतः अंध (LOW VISION)
३) कर्णबधिरत्व (HEARING IMPAIRMENT)
४) वाचादोष (SPEECH AND LANGUAGE DISABLITY)
५) अस्थिव्यंग (LOCOMOTOR DISABILITY)
६) मानसिक आजार (MENTAL ILLNESS)
७) अध्ययन अक्षम (LEARNING DISABILITY)
८) मेंदूचा पक्षाघात (CEREBRAL PALSY)
९) स्वमग्नता (AUTISM)
१०) बहुविकलांग (MULTIPLE DISABILITY )
११) कुष्ठरोग (LEPROSY CURED PERSON )
१२) बुटकेपणा (DWARFISM)
१३) बौध्दिक अक्षमता (INTELLECTUAL DISABILITY)
१४) अविकसित मांसपेशी (MUSCULAR DYSTROPHY)
१५) मज्जासंस्थेचे तीव्र आजार (CHRONIC NEUROLOGICAL CONDITION)
१६) मल्टीपल स्केलेरोसीस (MULTIPLE SCLEROSIS)
१७) थेलेसेमिया (THALASSEMIA)
१८) हिमोफेलीया (HEMOPHILIA)
१९) सिकलसेल डिसीज (SICKLE CELL DISEASE)
२०) ॲसीड हल्लाग्रस्त पीडित (ACID ATTACK VICTIM)
२१) कंपवात रोग (PARKINSONS DISEASE)

**✻ ओळख करून घेऊया. 'अ' गट म्हणजे नेमके काय बरं....**

**✻ 'अ' गट म्हणजे नियमित शाळेत सामान्य शिक्षकांद्वारे दिव्यांग विद्यार्थ्यांना नियमित अध्ययन –अध्यापन केले जाते त्यास 'अ' गट असे म्हणतात.**

## ✻ 'अ' गटात येणारे (बसणारे) विद्यार्थी

१) अंशत: अंध (LOW VISION)
२) वाचादोष (SPEECH AND LANGUAGE DISABILITY)
३) अस्थिव्यंग (LOCOMOTOR DISABILITY)
४) बुटकेपणा (DWARFISM)
५) कुष्ठरोग (LEPROSY CURED PERSON)
६) अविकसित मांसपेशी (MUSCULAR DYSTROPHY)
७) मज्जासंस्थेचे तीव्र आजार (CHRONIC NEUROLOGICAL CONDITION)
८) मल्टीपल स्केलेरोसीस (MULTIPLE SCLEROSIS)
९) थेलेसेमिया (THAL ASSEMIA)
१०) हिमोफेलीया (HEMOPHILIA)
११) सिकलसेल डिसीज (SICKLE CELL.DISEASE)
१२) ॲसीड हल्लाग्रस्त पीडित (ACID ATTACK VICTIM)
१३) कंपवात रोग (PARKINSONS DISEASE)
१४) मानसिक आजार (MENTAL ILLNESS)

**✻ खालील दिव्यांग प्रवर्गातील विद्यार्थ्यांना अध्ययन अध्यापन करत असतांना वर्गव्यवस्थापन करणे आवश्यक आहे. ते प्रवर्ग पुढीलप्रमाणे**

१) अंशत: अंध (LOW VISION) विद्यार्थ्यास दूरचे/जवळचे कमी दिसते. डोळ्यांमध्ये तिरळेपणा असू शकतो.

२) वाचादोष: (SPEECH AND LANGUAGE DISABILITY) विद्यार्थी बोलण्यास अडखळतात. टाळूला छेद व दुभंगलेले ओठ असू शकतात,

३) अस्थिव्यंग (LOCOMOTOR DISABILITY) अस्थिव्यंग विद्यार्थी चालणे, सूक्ष्मकारक कौशल्य, नैसर्गिक क्रियांवर नियंत्रण ठेवणे तसेच हालचाल करणे यासारख्या शारीरिक क्रिया करण्यासाठी पूर्णत: किंवा अंशतः अक्षम असतात.

४) बुटकेपणा (DWARFISM) शारीरिक उंची कमी असणाऱ्या प्रौढ व्यक्तीची उंची ४ फूट १० इंच किंवा १४७ सेमी पेक्षा कमी असते.

सदर विद्यार्थ्यासाठी अध्ययन अध्यापन करत असतांना वर्ग व्यवस्थापन, शैक्षणिक साहित्यनिर्मिती (गरजेनुरुप) व अडथळा विरहीत वातावरण निर्मिती करणे आवश्यक आहे. जेणे करून दिव्यांगत्वामुळे त्यांच्या गुणवत्तेवर विपरीत परिणाम होणार नाही.

**✻ खालील दिव्यांग प्रवर्गातील विद्यार्थ्यांना अध्ययन अध्यापन करत असतांना फारशा अडचणी उद्भवत नाही. ते सर्वसामान्य मुलांप्रमाणे शिक्षण घेतात.**

५) कुष्ठरोग (LEPROSY CURED PERSON)
६) अविकसित मांसपेशी (MUSCULAR DYSTROPHY)
७) मज्जासंस्थेचे तीव्र आजार (CHRONIC NEUROLOGICAL CONDITION)
८) मल्टीपल स्केलेरोसीस (MULTIPLE SCLEROSIS)
९) थॅलेसेमिया (THAL ASSEMIA)

१०) हिमोफेलीया ( HEMOPHILIA)
११) सिकलसेल डिसीज (SICKLE CELL DISEASE)
१२) ॲसीड हल्लाग्रस्त पीडीत (ACID ATTACK VICTIM)
१३) कंपवात रोग (PARKINSONS DISEASE)
१४) मानसिक आजार (MENTAL ILLNESS)

**✻ सामान्य वर्गात आमची बैठक व्यवस्था :**

१) मला पुढच्या बाकावर बसवा. (अंशत: अंध, बुटका)
२) माझ्या जवळ हुशार व मला समजून घेणाऱ्या वर्गातील विद्यार्थ्याला बसवा. (वाचादोष)
३) वर्गात पुरेसा उजेड असल्यास मला दिसण्यास अडचण येणार नाही.(अंशत: अंध)
४) मला बसण्यायोग्य बाक असावा. (बुटका, मज्जासंस्थेचे तीव्र आजार)

**✻ वर्ग व्यवस्थापन :**

१) शिक्षकांनी अध्यापन करतांना विद्यार्थ्याकडे बघून अध्यापन करावे. याच्याने अंशतः कर्णबधिर व वाचादोष असणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांना तसेच सर्व सामान्य विद्यार्थ्यांना समजण्यास मदत होईल.
२) गणित विषय शिकवित असतांना याविषयी विशेष काळजी घेऊ या. (गट पद्धत)
३) शिक्षकांनी अध्यापन करत असतांना आवाजात प्रसंगानुरुप चढ उतार, सुस्पष्ट उच्चार व समजेल अशा हळू आवाजात आपण बोलतातच यामुळे याचा फायदा विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना नक्कीच होईल व तो विषय सहज समजेल.
४) कविता सूर, ताल व लय पध्दतीने म्हटल्यावर तसेच गोष्टी शिकवितांना चेहऱ्यावर हावभाव व कृतीयुक्त असल्यावर विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना व सर्व सामान्य विद्यार्थ्यांना सुद्धा विषयाचे आकलन होण्यास अधिक मदत होते.
५) कृतीयुक्त पद्धतीने शिकवित असतांना दिव्यांग विद्यार्थ्यांना सुद्धा संधी उपलब्ध करून देऊन त्यांच्या क्षमतेनुसार सहभाग नोंदवूयात

**✻ 'अ' गटासाठी विशेष शिक्षकाची भूमिका :**

१) नियमित शाळेत प्रत्यक्ष भेट देवून सामान्य शिक्षकांना अध्ययन-अध्यापन करतेवेळी येणाऱ्या कठीण संकल्पना सोप्या करून समुपदेशन करणे.(किमान आठवड्यातून २ भेटी आवश्यक)
२) विशेष गरजा असणाऱ्या लाभार्थी विद्यार्थ्यांना समग्र शिक्षा अंतर्गत मिळणाऱ्या सोई-सुविधा जसे शैक्षणिक सहाय्यभूत सेवा, भौतिक सुविधा आवश्यक आहे का? याबाबत संबंधित वर्ग शिक्षकांना समुपदेशन करणे.(वेळोवेळी माहिती देणे अपेक्षित)
३) दिव्यांग लाभार्थी विद्यार्थ्यांना अलिम्को शिबिरामार्फत मिळालेल्या साहित्यांचा वापर कशा पद्धतीने करावा याबाबतची माहिती संबंधित वर्गशिक्षकांना सहजपणे अवगत करणे, तसेच प्रत्यक्ष अनुभव देवून मार्गदर्शन करणे.
४) दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिबिराची जसे अलिम्को (मोजमाप शिबिर), आकडी मस्तिष्क शिबिर, वैद्यकीय तपासणी, प्रमाणपत्र याबाबतीत वेळोवेळी निरोप देणे.
५) प्रोत्साहन भत्ता(दिव्यांग विद्यार्थी), मदतनिसभत्ता, प्रवासभत्ता, वाचकभत्ता, लेखनीकभत्ता, एकंदरीत समग्र शिक्षा अंतर्गत येणाऱ्या सर्व सोई सुविधांचा दिव्यांग विद्यार्थ्यांना लाभ मिळावा याबाबत विशेष प्रयत्न करणे..

**सदर हस्तपुस्तिका ही समावेशित वर्गाची असून सर्वसामान्य वर्गात वर्ग शिक्षकाव्दारे अध्ययन अध्यापन करतेवेळी अगदी सहजपणे याचा उपयोग होईल. एकच घटक सर्व समावेशक कसा असेल? याचा विचार यात निश्चितच केलेला दिसून येईल.**

**✻ राष्ट्रीय शैक्षणिक धोरण :-** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सन २०२० नुसार सन २०२६-२०२७ पर्यंत मूलभूत भाषिक व गणितीय कौशल्य प्राप्त करण्यास सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे. वय वर्षे ३ ते ९ वयोगटातील सर्व विद्यार्थ्यांना मूलभूत साक्षरता व संख्याज्ञान प्राप्त एक राष्ट्रीय अभियान राबवून त्याची राज्यामध्ये अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. सदर अभियानात विद्यार्थी, पालक, शाळा, शिक्षक व समाज या सर्वांनी सर्वंकष पुढाकार घेऊन राज्यातील सर्व विद्यार्थ्यांच्या भावी शिक्षणाचा पाया मजबूत करणे गरजेचे आहे.

इयत्ता ३ रीत गेलेल्या तथापि, अपेक्षित क्षमता प्राप्त करु न शकलेल्या विद्यार्थ्यांसाठी निपुण भारत, अंतर्गत पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान अभियानाची अंमलबजावणी करण्यास शासन मान्यता देत असून पुढीलप्रमाणे दिशानिर्देश करीत आहे.

**१) भाषिक कौशल्ये :–** ३ री ते ९ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांना प्रारंभिक भाषा व विकास होण्यासाठी मातृभाषेमध्ये मौखिक भाषा ज्ञान, समजपूर्वक ऐकणे व त्याचे आकलन, मुद्रणशास्त्र, व उच्चारशास्त्र यांच्या विकासाची जाणीव व लेखन कौशल्याचा विकास होणे आवश्यक आहे. भाषिक कौशल्ये प्राप्त होण्यासाठी भाषेचे पूर्वज्ञान महत्त्वाचे आहे. या विद्यार्थ्यांचा भाषेचा पाया मजबूत असतो ते विद्यार्थी इंग्रजी व अन्य भाषा अधिक सहजतेने शिकू शकतात.

## २) पायाभूत साक्षरतेचे घटक

१) **मौखिक भाषा:–** लेखन व वाचनाची कौशल्ये विकसित करण्यासाठी मौखिक भाषेचा विकास महत्त्वाचा आहे. (प्रकटवाचन, संवाद कौशल्य, भाषिक उपक्रम इ.शब्दांचा समावेश असावा.)

२) **उच्चार शास्त्राची जाणीव :–** शब्दांची लय व ध्वनीची जाणीव या बाबींचा योग्य वापर होणे गरजेचे आहे.

३) **सांकेतिक भाषा / लिपी समजून घेणे –** यामध्ये छापील मजकूरांचे आकलन करण्याची क्षमता अक्षरांचे ज्ञान, सांकेतिक भाषा, लिपी समजून घेणे, शब्द ओळखणे.

४) **शब्द साखळी :–** मौखिक शब्द संग्रह, वाचन /लेखन शब्दसंग्रह व शब्दांच्या विविध अर्थछटा.

५) **वाचन व आकलन :–** मजकुराचे वाचन करून अर्थ समजून घेणे, माहिती प्राप्त करणे व मजकुराचे स्पष्टीकरण करणे.

६) **वाचनातील ओघवतेपणा :–** मजकूर अचूकपणे व लयबद्ध वाचणे, अभिव्यक्ती व आकलन .

७) **लेखन :–** अक्षरे व शब्द लिहिणे, अभिव्यक्तीसाठी लिहिणे, लेखन क्षमता वाढविणे.

८) **आकलन :–** छापील मजकुर / पुस्तके यामुळे आकलन, कौशल्ये विकसित होण्यास मदत.

९) **वाचन संस्कृती/वाचनाकडे कल :–** यामध्ये विविध तऱ्हेची (मनोरंजनात्मक, चिंतनात्मक, कहाणी, कविता) पुस्तके व इतर वाचन साहित्य (वृत्तपत्रे, मासिक, साप्ताहिक) या साहित्य वाचनाकडे कल असणे.

वरील सर्व भाषा विषयाची कौशल्य 'अ' गटातील विद्यार्थी आत्मसात करतात. त्यांना विद्यार्थ्यांना अध्ययन अध्यापन करतांना फारसे आव्हाने येत नाहीत.

परंतु यासाठी विद्यार्थ्यांची गरज व क्षमता लक्षात घेऊन त्यानुसार विद्यार्थ्यांना वाचन, लेखनाचा सराव करुन घेऊयात.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| भाषा साक्षरता | अंगणवाडी/ बालवाडी अखेर अक्षरे व त्यासंबंधी आवाज ओळखतो किमान २–३ अक्षरे असलेले साधे शब्द वाचतो | इयत्ता १ ली अखेर अपठीत मजकूर असलेली किमान ४–५ साधे शब्द वाक्ये वाचतो | इयत्ता २ री अखेर अपठीत मजकूर ४०–५० शब्द प्रती मिनिट अर्थासकट वाचतो | इयत्ता तिसरी अखेर अपठीत मजकूर ६० शब्द प्रती मिनिट अर्थासकट वाचतो. |

## आनंदी व्यक्तिमत्त्वाची जोपासना (WELL BEING GOALS)

मुलांना शैक्षणिक वातावरणात आनंदी व सुरक्षित वाटते. चांगल्या सवयी विकसित होतात. शरीर तंदुरुस्त राहते. स्वत:विषयीचा आदर वाढतो. स्वत:बाबत सकारात्मक कल्पना निर्माण होतात व सकारात्मक दृष्टिकोनाचे योग्य संवर्धन केल्यास आयुष्यभर लाभदायक ठरते. सर्व शिक्षकांनी मुलांच्या सामाजिक व भावनात्मक स्वास्थ्याची जपवणूक कशी करावी याविषयी संवेदनशील असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे विद्यार्थी व शिक्षक यांच्यात आंतरक्रिया होऊन अध्ययन अध्यापन हे आनंददायी व प्रेरणादायीच होईल.

या पुस्तिकेत आता आपण बघुया की, विद्यार्थ्यांची अध्ययनशैली ठरलेल्या अध्ययन निष्पत्तीनुसार, अध्ययन अनुभवाची जोड देवून विद्यार्थ्यांची अध्ययन फलनिष्पत्ती पूर्णत्वाकडे नेण्याचा हा छोटासा प्रयत्न सोबत दिलेल्या कृतीपुस्तिकेतून सादर करीत आहोत. या प्रयत्नातून आपल्यासारख्या सामान्य शिक्षकांना आपले अध्ययन अनुभव नक्कीच जोडता येईल.

## इयत्ता १ ली (मराठी)

| अ.क्र | दिव्यांग प्रवर्ग | अध्ययन शैली | अध्ययन निष्पत्ती क्रमांक | क्षमता | अध्ययन अनुभव | शैक्षणिक साहित्य | अध्ययनाची कृती / प्रतिसाद | अध्ययन अनुभवांची फलनिष्पत्ती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | 'अ' गटात येणारे दिव्यांग प्रवर्ग | बहु अध्ययन शैली | ०१.०१.०१<br>०१.०१.०२ | श्रवण भाषण | स्वत:च्या भाषेत कविता म्हणतील, आपले अनुभव/घडलेल्या घटना व्यक्त करतील. कविता ताला-सूरात म्हणत असतांना आपला अस्थिव्यंग विद्यार्थी व वाचादोष विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांसोबत ताला-सूरात सूर मिसळून कविता म्हणतील. इतर मौखिक कविता ऐकवून म्हणून घेऊ या. कुटुंबातील सदस्यांविषयी स्वभाषेत माहिती सांगतील, मित्रांविषयी माहिती सांगतील, मित्रांविषयी माहिती स्वभाषेत सांगतील. त्याला असणाऱ्या एखाद्या घटनांची माहिती त्याच्याकडून मौखिक वदवून घेऊया आणि त्यांच्या माहितीला अजून जोड देऊया. | बडबडगीतांच्या कॅसेट, युट्यूब वरील बडबडगीते. परिसरातील प्रत्यक्ष अनुभव जसे पान, फुल, फुलपाखरू इत्यादी. | विद्यार्थी स्वत:च्या भाषेत कविता ऐकवतील घडलेली/बघितलेली घटना त्यांच्या भाषेत सांगतील पायाने व्यंग असलेला अस्थिव्यंग विद्यार्थी खुर्चीवर बसून हाताच्या मदतीने हातवारे करून इतर विद्यार्थ्यांबरोबर कविता तालासूरात म्हणतात/म्हणेन. | विद्यार्थी कविता म्हणतो. घडलेली घटना स्वत:च्या भाषेत व्यक्त करतो. वाचादोष असणारा दिव्यांग विद्यार्थी कविता त्याला जमेल तशी म्हणतो. अस्थिव्यंग विद्या |
| २ | | | ०१.०१.<br>२००३ | श्रवण भाषण | परिसरात पाहिलेले प्राणी, पक्षी यांचे आवाज ओळखतील | परिसरातील प्रत्यक्ष प्राणी<br>पक्षी पक्ष्यांचे कार्ड | परिसरात नेहमी दिसणारे परिचित असणारे व आवडणारे प्राणी, पक्षी यांच्या आवाजाची नक्कल करतील. | प्राणी, पक्षी ओळखतो |
| ३ | | | | | आवाजाचें सूक्ष्म निरीक्षण करतीलच आपण त्यातील काही बाबी अजून स्पष्ट करूयात उदा. ढगांचा गडगडाहट, पानांची सळसळ या आवाजांची प्रत्यक्ष अनुभव देवून व प्रत्यक्ष निरीक्षण करायला लावूया.<br>अंशत:, अंध, अस्थिव्यंग व Autism विद्यार्थ्यांना इतर विद्यार्थ्यांबरोबर सहभाग करून घेऊया व त्यांना पण संधी उपलब्ध करून देवूयात. | फ्लॅश कार्ड, ऑडीओ कॅसेट, मोबाईलद्वारे | वाचादोष विद्यार्थी नक्कल करतांना ज्या अक्षरावर किंवा शब्दावर अडखळेल त्या अक्षराला किंवा शब्दाला पुन्हा पुन्हा ऐकवून जास्तीत जास्त चांगला प्रतिसाद देण्याचा प्रयत्न करतील. अंशत: अंध व मतिमंद विद्यार्थी देखील आवाजांची नक्कल करतील. | प्राण्यांचा व पक्ष्यांचा आवाज काढून दाखवतो उदा. मांजराचा म्याव-म्याव तसेच कुत्र्यांचा भुंकण्याचा आवाज काढतो. प्राण्यांचे चित्र व प्राण्यांची नावे तसेच रंग यांचा सहसंबंध जोडतो. |

## इयत्ता १ ली (मराठी)


| अ.क्र | दिव्यांग प्रवर्ग | अध्ययन शैली | अध्ययन निष्पत्ती क्रमांक | क्षमता | अध्ययन अनुभव | शैक्षणिक साहित्य | अध्ययनाची कृती / प्रतिसाद | अध्ययन अनुभवांची फलनिष्पत्ती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४. | | | ०१.०१.०४ | निरीक्षण भाषण | घटनेनुसार चित्रांचा क्रम निश्चित करून घेतील त्यातील अजून असणारे बारकावे समजावून देऊ या. अंशत: अंध विद्यार्थ्यांसाठी ठळक प्रिंट असलेल्या साहित्याचा आपण उपयोग करू या. | चित्रांचे फ्लॅशकार्डस् चलचित्रपट (२ मिनिटांचा) | आपले विशेष बालक देखील चित्राचे अचूक निरीक्षण त्यांच्या क्षमतेनुसार करतील. सवंगड्यांसमवेत चर्चा करतील, गप्पा मारतील. | निरीक्षण क्षमता वाढते, विद्यार्थी क्षमतेनुसार निरीक्षण करतो. चित्र बघून गोष्ट सांगतो/ वर्णन करतो. |
| ५ | | | ०१.०१.०५ ०१.०१.०६ | निरीक्षण भाषण | विविध चित्रांचे निरीक्षण करून त्यातील खेळ ओळखतील. त्यातील वेगळेपणा समजावून देवूया त्यावेळी दैनंदिन जिवनातील खेळाशी सांगड घालून आपण त्याची (दिव्यांग बालकांची) भाषेची गोडी वाढवूया. अस्थिव्यंग विद्यार्थीदेखील स्वत:च्या आवडीच्या खेळाची नावे सांगण्यास प्रवृत्त होतील. | घटनेनुसार चित्र कात्रणे शब्दचिठ्ठ्या | विद्यार्थी घटना समजून घेतील. उदा. एखाद्या खेळाचे चित्र दाखविल्यास त्या खेळाचे नाव सांगतील. आपले विशेष बालक देखील आपल्या मित्रांच्या मदतीने चित्रातील पात्राचे अनुकरण तो त्याच्या क्षमतेनुसार अनुकरण करण्याचा प्रयत्न करतील. | विद्यार्थ्यांना खेळाची आवड निर्माण होते. निरीक्षण क्षमता वाढते. आपले दिव्यांग विद्यार्थी देखील आपल्या क्षमतेनुसार खेळ खेळतो. आवडणाऱ्या खेळांची नावे सांगतील. |
| ६ | | | ०१.०१.०७ | श्रवण भाषण | ठराविक शब्दांवर जोर देवून आवाजातील चढ उतार ओळखतील. ध्वनीतील वेगळेपणा समजावून देवू या. अरे वा. वाचादोष असणाऱ्या आपल्या विद्यार्थ्याला सराव/त्याला समजणारे उदाहरण देवू या. कृतीतून सांगू या. अक्षर, शब्द, वाक्य यातील फरक ओळखतील | ध्वनीफीत ध्वनीचित्रफित उफ, झांज, घुंगरु.. | विद्यार्थी त्यांच्या पूर्व अनुभवावरून शब्दांतील चढ-उतार ओळखतील. ध्वनीतील फरक स्व-अनुभवाची सांगड घालून समजतील. | विद्यार्थ्यांना ध्वनीतील वेगळेपणा समजतो. श्रवण क्षमता वाढते. |
| ७ | | | ०१.०१.०८ ०१.०१.०९ | निरीक्षण श्रवण भाषण | परिसरातील विविध प्रकारचे छापील चित्र दाखवतीलच त्यानुसार अनुभवांची सांगड घालून अंदाज व्यक्त करतील. अंशत: अंध, अस्थिव्यंग, बुटकेपणा असणाऱ्या आपल्या विद्यार्थ्यांना आपण चित्र/फलक यांच्या निकट नेऊ या. शक्य असल्यास | चित्रांचे फलक चित्रफित शब्दचिठ्ठ्या वाक्यपट्टी | विद्यार्थी स्व अनुभवाच्या आधारे चित्रांचा अंदाज करतात. प्रत्यक्ष अनुभव घेतील. उदा. बाजारात जातील. अक्षर, शब्द ओळखून त्यांची.वाक्यात जोडतील. | निरीक्षण क्षमता वाढते, वैचारिक क्षमतेला चालना मिळते. नवीन शब्द वापरतात. अक्षर, शब्द ओळखतो. |


## इयत्ता १ ली (मराठी)

| अ.क्र | दिव्यांग प्रवर्ग | अध्ययन शैली | अध्ययन निष्पत्ती क्रमांक | क्षमता | अध्ययन अनुभव | शैक्षणिक साहित्य | अध्ययनाची कृती / प्रतिसाद | अध्ययन अनुभवांची फलनिष्पत्ती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | त्यासारखे उदा. बाजार, जत्रा, सर्कस अशा ठिकाणी नेऊया. किंवा चित्रफित दाखवू या. लिखित साहित्यातील शब्द, अक्षर ओळखतील. तसेच सरावावर अधिक भर देऊ. वाक्यातून शब्द, अक्षर यांच्या जोडणी करून घेतात. | | | |
| ८ | | | ०१.०१.१० | निरीक्षण वाचन भाषण संभाषण | विद्यार्थ्यांच्या परिचीत विषयाच्या अनुषंगाने चित्र दाखवून त्यावर स्वभाषेत कथन करण्यास प्रवृत्त करू या. विद्यार्थ्याला स्व-अनुभव मांडतांना त्याला आणखी इतर अनुभवाविषयी जोड देवू या. विद्यार्थ्यांच्या वैचारिक निरीक्षण भाषिक क्षमतेला वाव देवू या. | चित्रे स्थळ भेट, मंदिर, बगीचा पावसाळी सहल | चित्रांचे स्वत:च्या क्षमतेनुसार निरीक्षण करून स्वभाषेत कथन करतील अंदाज व्यक्त करतील. | निरीक्षण क्षमता वाढते चित्रांवरून अंदाज व्यक्त करतो. शब्दसमूह वाढवतील . |
| ९ | | | | श्रवण भाषण | वर्णमालेतील अक्षरांचा फ्लॅशकार्डच्या व त्याचा उच्चार यांचा सहसंबंध लावूयात. अंशत: अंध विद्यार्थ्यास ठळक व रंग-संगतीच्या कार्डचा वापर जास्तीत-जास्त करून घेवू. वाचादोष विद्यार्थीस उच्चाराकडे लक्ष देवून सराव करून घेऊ या. उदा. वर्णमालेतील अक्षर व चित्र जोडतात(चमचा चे चित्र व चमचा चे 'च' हे अक्षर) | वर्णमालेतील अक्षरांचे फ्लॅशकार्ड वर्णमाला चार्ट चित्र व अक्षर चार्ट | विद्यार्थी त्यांच्या क्षमतेनुसार वर्णमालेतील अक्षर व ध्वनी ओळखतील चित्र व वर्णमालेतील अक्षर जोडतील | आपले दिव्यांग बालक देखील वर्णमालेतील अक्षर व ध्वनी ओळखतील. |
| १० | | | ०१.०१.१२ ०१.०१.१३ ०१.०१.१४ | श्रवण भाषण लेखन | विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण होण्यासाठी विविध गोष्टींचे पुस्तक, बडबडगीते, देशभक्तीपर गीते असे पुस्तके उपलब्ध करून वाचनास प्रवृत्त करू या. जसे वर्गात अध्ययन कोपरा. दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी सुंदर रंग-संगती असलेली पुस्तके उपलब्ध करून देऊ या. | विविध गोष्टींची पुस्तके | आवडीचे पुस्तक वाचण्यास प्रवृत्त होतील. ननवीन पुस्तके हाताळतील | पुस्तक संग्रहालयातून आवड असणारे पुस्तक निवडतो. स्वत:ला आवडणारे पुस्तक सांगतो. आवड असणारे पुस्तकांचे नावे सांगतांना त्याचा आत्मविश्वास वाढवतील. |

## इयत्ता १ ली (मराठी)

| अ.क्र | दिव्यांग प्रवर्ग | अध्ययन शैली | अध्ययन निष्पत्ती क्रमांक | क्षमता | अध्ययन अनुभव | शैक्षणिक साहित्य | अध्ययनाची कृती / प्रतिसाद | अध्ययन अनुभवांची फलनिष्पत्ती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ११ | | | | | लेखनपूर्व कौशल्य आपण उत्तम रितीने शिकवतोच त्यातच रंगीत खडूचा वापर करून विद्यार्थ्यास लेखनाची आवड निर्माण करू या. | अक्षर चिठ्ठ्या, रेषेंच्या (आडव्या, तिरप्या, सरळ) चिठ्ठ्या | विद्यार्थी रेषा जोडण्याचा त्यांच्या द्धतीने प्रयत्न करतील. आडव्या सरळ, तिरप्या रेषेच्या सहाय्याने क्षमतेनुसार शब्द लिहिण्याचा प्रयत्न करतील. | अंशत: अंध विद्यार्थीदेखील रंग –संगतीचा वापर करून रेषा जोडतो. रेषांच्या सहाय्याने अर्थपूर्ण शब्द तयार करतील. |
| १२ | | | | | विविध चित्र (रंगीत) व त्याचा सहसंबंधीत शब्द याची ओळख करतांना दैनंदिन वापरातील गोष्टी विद्यार्थ्यांकडूनच आपल्या कल्पकतेने काढून घेऊ या. उदा. केरसूनी, लाटणे, झाडू, स्वयंपाक घरातील भांडी इत्यादी | चित्रांचे फ्लॅशकार्ड | दिव्यांग विद्यार्थी देखील त्यांना येतील तशी चित्र रेखाटतील व आवडीनुसार त्यांना नावे देतील. पूर्वानुभवानुसार विविध चित्र ओळखतो व उपयोग जाणतो. | चित्र काढतील व स्वत: नावे देतील चित्र ओळखून उपयोग सांगतील. |



## इयत्ता २ री (मराठी)

| अ.क्र | दिव्यांग प्रवर्ग | अध्ययन शैली | अध्ययन निष्पत्ती क्रमांक | क्षमता | अध्ययन अनुभव | शैक्षणिक साहित्य | अध्ययनाची कृती / प्रतिसाद | अध्ययन अनुभवांची फलनिष्पत्ती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | 'अ' गटात येणारे दिव्यांग प्रवर्ग | बहु अध्ययन शैली | ०२.०१.०१ ०२.०१.०२ | श्रवण, भाषण, लेखन, वाचन, संभाषण | चित्रावरून एखाद्या गोष्टीचा अंदाज लावण्यासाठी विद्यार्थ्यांस प्रोत्साहन देऊ या. घडलेल्या घटनांचा सहसंबंध लावून वर्णन करण्याची संधी विद्यार्थ्यांना देऊया. गाणी, गप्पा-गोष्टी बारकाईने श्रवण करण्याची व स्वभाषेत व्यक्त होण्याची संधी वेळोवेळी उपलब्ध करून देऊया. | चित्रांची मालिका दर्शवणारे तक्ते, कथा, कविता, गाणी इत्यादी | विद्यार्थी चित्रावरून गोष्टीचा अंदाज लावतील व स्वभाषेत कथन करतील.<br>घरी व परिसरात घडलेल्या घटनांचा सहसंबंध लावतात व आपल्या भाषेत वर्णन करतील, गाणी, गप्पा गोष्टी बारकाईने श्रवण करतील व स्वत:च्या भाषेत मांडतील/सांगतील. | विविध उद्देशासाठी विद्यार्थी प्रश्न विचारतो व उत्तरावरून अंदाज लावतो. त्यातून त्याचा आत्मविश्वास वृद्धींगत होतो. विद्यार्थ्यांचे भाषिक कौशल्य पक्की होतात. विद्यार्थी आपल्या भाषेत आपल्या पद्धतीने व्यक्त होतात. |
| २ | | | ०२.०१.०३ ०२.०१.०४ | श्रवण, भाषण, लेखन, वाचन, संभाषण | विद्यार्थ्यांशी गप्पा-गोष्टी करू या व त्यांना ऐकलेल्या मजकुराचा अर्थ लावण्यास गप्पांमधून मदत करूया.<br>विद्यार्थ्यांना आपसात चर्चा करण्यासाठी सहजपणे विषय उपलब्ध करून देऊ या.<br>चित्र व अर्थ यांचा सहसंबंध लावण्यासाठी प्रोत्साहित करू या. ज्यातून त्यांची वैचारिक क्षमता वाढीस लागेल. | पाठ्यक्रमानुरुप विषयाची निवड करून तो चर्चेस देण्यासाठी वाक्य पट्ट्या, चित्र इत्यादी देवू (भाषा पेटीच्या पूर्णपणे उपयोग करूयात) | विद्यार्थ्यांना गप्पा मारण्याची संधी दिल्यास प्रत्येक विद्यार्थी सहभागी होतील व आपले विचार आपल्या पद्धतीने आपल्या भाषेमध्ये मांडतील.<br>विद्यार्थी विविध चित्रांचे निरीक्षण करतील त्याचा अर्थ लावतील व आपल्या भाषेत व्यक्त होतील. | विद्यार्थी पाहिलेल्या, ऐकलेल्या गोष्टी, कथा, कविता इत्यादीबाबत गप्पा करून आपले विचार मांडतील ऐकलेल्या, पाहिलेल्या गोष्टींचा परस्पर संबंध जोडतात व त्यावर आपल्या भाषेत व्यक्त होतात. |
| ३ | | | ०२.०१.०५ | श्रवण, भाषण, लेखन, वाचन, संभाषण | विद्यार्थ्यांना शब्दांच्या आणि ध्वनींच्या उच्चारांची मजा अनुभवण्यासाठी त्यांना लय आणि ताल असणारे वाक्यांचे नमुने सांगुया. उदा. एक होता कावळा, जरासा बावळा, विद्यार्थ्यांना यासारखे वाक्य तयार करण्यासाठी प्रोत्साहन देऊया. | वाक्य चिट्ट्या, शब्द पट्ट्या | विद्यार्थी शब्दांच्या आणि ध्वनीच्या उच्चाराची मजा अनुभवतील विद्यार्थी प्रयत्नपूर्वक विविध उच्चारांचे शब्द जोडून पाहतील. | विद्यार्थी यमक जुळणारे विविध शब्द शिकतात. स्वत: उच्चार करतात. वाचादोष असणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रतिसाद आहे तसा सराव करून घेऊ या भुर्रर- र्रर्र इत्यादी. |
| ४ | | | ०२.०१.०६ | श्रवण, भाषण, लेखन, वाचन, संभाषण | स्वत:च्या कल्पनेने कथा, कविता इत्यादी रचना करण्यासाठी व त्यामध्ये अधिकची भर घालण्यासाठी विद्यार्थ्यांना नमुना दाखल पाठ्य पुस्तकाशी सांगड घालून नवीन रचना करण्यासाठी संधी उपलब्ध करून देऊया. | बालसाहित्य, गोष्टी, कविता | विद्यार्थी वेगवेगळ्या गोष्टी, कविता ऐकतील व संधी मिळाल्यामुळे त्यामध्ये भर घालतील तसेच स्वत:च्या कल्पनेने नवीन रचना वर्गात ऐकवतील. | विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तिला वाव मिळतो. विद्यार्थी ऐकलेल्या गोष्टीत स्वत: भर घालतात. तसेच नवीन कल्पक गोष्ट तयार करतात. |

## इयत्ता २ री (मराठी)

| अ.क्र | दिव्यांग प्रवर्ग | अध्ययन शैली | अध्ययन निष्पत्ती क्रमांक | क्षमता | अध्ययन अनुभव | शैक्षणिक साहित्य | अध्ययनाची कृती / प्रतिसाद | अध्ययन अनुभवांची फलनिष्पत्ती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | | | ०२.०१.०७ | श्रवण, भाषण, लेखन, वाचन, संभाषण | विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार व क्षमतेनुसार चित्रांचे पोस्टर्सचे निरीक्षण करून प्रश्न विचारण्यासाठी व त्यावर प्रतिक्रिया देण्यासाठी प्रोत्साहन देऊया. चित्राच्या आधारे अनुमान लावण्याची संधी उपलब्ध करून देऊया ज्यामुळे विद्यार्थी वेगवेगळ्या कथा, कविता वाचतील तसेच आवडीनुसार कविता/गोष्टी संग्रह करतील व वाचन कौशल्य विकसित होईल. | गोष्टींची पुस्तके स्टीकर्स पोस्टर्स इत्यादी | विद्यार्थी स्वत: आवडीने चित्रांचे, पोस्टर्सचे निरीक्षण करतील. त्यावर प्रश्न विचारतील व आपली प्रतिक्रिया देतील. स्वत: अनुमान लावतील स्वयंप्रेरणेने इतर कथा/कविता वाचतील व त्यांचा संग्रह करतील. | विद्यार्थ्यांची निरीक्षण क्षमता वाढते. जिज्ञासूपणे प्रश्न विचारतात. अनुमान काढतात. अवांतर वाचन करतात, वाचन कौशल्य विकसित होते. |
| ६ | | | ०२.०१.०८<br>०२.०१.०९ | श्रवण, भाषण, लेखन, वाचन, संभाषण | विद्यार्थ्यांना चित्रांचे निरीक्षण करण्याची संधी देऊन अचूक निरीक्षणानुसार योग्य क्रम लावण्याची संधी देऊ या. चित्र मालिकेतील घटनांचे निरीक्षणअंती स्वभाषेत गोष्ट तयार करण्यासाठी प्रोत्साहित करू या. वाचलेल्या मजकुरावर चर्चा करण्याची संधी देऊ या. | बालमित्र (पुरवणी) लोव्हिजन किट्स लार्ज प्रिंटचे पुस्तक | विद्यार्थी स्वत: निरीक्षण करतील. निरीक्षणानुसार योग्य क्रम लावतील. निरीक्षण करून स्वत:च्या भाषेमध्ये व्यक्त होतील. आपला प्रतिसाद देतील. स्वत: गोष्ट तयार करतील चर्चेत सहभाग घेतील. | विद्यार्थ्यांची निरीक्षण क्षमता वाढते. शब्दसंग्रह विकसित होतो. योग्य क्रम लावतात. वैचारिक क्षमता वाढीस लागते. चर्चेत सहभाग घेतात. |
| ७ | | | ०२.०१.१० | श्रवण, भाषण, लेखन, वाचन, संभाषण | चित्रात दिसणारे प्राणी काय बोलत असतील? असे चित्राचे निरीक्षण करून विद्यार्थ्यांना कल्पना करण्याची संधी देऊ या. विद्यार्थ्यांना अक्षरांचा योग्य क्रम लावून अर्थपूर्ण शब्द तयार करण्यासाठी संधी देऊ या. गोष्टींचा पूर्वभाग सांगून उत्तरार्ध विषयी अंदाज लावण्याबाबत प्रोत्साहित करूया. | विविध चित्र (पाळीव प्राणी, फुले, कार्टून्स, पक्षी इत्यादी) महापुरुषांचे फोटो इत्यादी. | विद्यार्थी चित्राचे निरीक्षण करतात व स्व कल्पनेने आपले अंदाज लावतील व आपल्या भाषेत व्यक्त होतील. विद्यार्थी गोष्ट पूर्ण करतात त्यात कल्पकतेने अधिक भर घालतील | विद्यार्थी पुर्वानुभवावरून अंदाज लावतात. विद्यार्थ्यांचा भाषीक विकास होतो. विद्यार्थी कल्पना करतात, अंदाज लावता. भाषा विकसित होते. |
| ८ | | | ०२.०१.११ | श्रवण, भाषण, लेखन, वाचन, संभाषण | विद्यार्थ्यांना लेखन करतांना अक्षर वळणदार काढण्यासाठी उभ्या, आडव्या, तिरप्या, वक्र गोलाकार रेषांचा सराव करून घेऊया. मुलांच्या क्षमतेनुसार सरावाद्वारे कारक कौशल्यांचा विकास करून घेऊया. अक्षर, शब्द व वाक्य यांचे निरीक्षण करण्याची संधी देऊन फरक समजावून सांगूया | अक्षरांचे कार्ड, शब्दांचे कार्ड, चित्राचे कार्ड, वाक्यपट्टी इत्यादी | विद्यार्थी विविध आकार यांचा लेखी सराव करतील. आकारांचे ओळख करून घेऊ या. उभ्या, आडव्या, तिरप्या, वक्र गोलाकार रेषांचा सराव करून घेऊया. | विद्यार्थी पुर्वानुभवावरून अंदाज लावतात. विविध आकारांची ओळख करून घेतात. |

## इयत्ता २ री (मराठी)

| अ.क्र | दिव्यांग प्रवर्ग | अध्ययन शैली | अध्ययन निष्पत्ती क्रमांक | क्षमता | अध्ययन अनुभव | शैक्षणिक साहित्य | अध्ययनाची कृती / प्रतिसाद | अध्ययन अनुभवांची फलनिष्पत्ती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | | | ०२.०१.१२ | श्रवण, भाषण, लेखन, वाचन, संभाषण | वाचादोष असलेल्या विद्यार्थ्यांचा ध्वनीचा उच्चार करून घेऊया त्यांना उच्चार करतांना येणाऱ्या कंपनाचा अनुभव देऊया.<br>उदा. कंठ: क,ख,ग,घ, दंत्य, त,थ,द,ध तालव्य : च,छ,ज,झ, ओष्ठ : प,फ,ब,भ विद्यार्थ्यांचे श्वसनाचे व्यायाम करून घेऊया. | थर्माकॉलचे गोळे, आरसा, स्ट्रॉ श्वसनाचे व्यायाम(स्टीकर्स) | वाचादोष असलेले विद्यार्थी ध्वनीचा उच्चार करतील, उच्चार करतांना येणाऱ्या कंपनांचा अनुभव घेतील. उदा. कंठ, दंत्य, तालव्य, ओष्ठ्य. | सर्व सामान्य विद्यार्थ्यांसोबत वाचादोष असलेले विद्यार्थी विविध ध्वनीचे उच्चार करतात. तसेच उच्चार करतांना विविध घेतात. विद्यार्थी श्वसनाचे व्यायाम करतात. |
| १० | | | ०२.०१.१३ | श्रवण, भाषण, लेखन, वाचन, संभाषण | विद्यार्थ्यांना वेग – वेगळ्या रंगाची ओळख करून देऊया व चित्र रंगवून चित्राचे वर्णन करण्याची संधी देऊ या विद्यार्थ्यांना पक्षांच्या विविध अवयवांची ओळख करून घेऊ या. LOW VISION विद्यार्थ्यांसाठी ठळक चित्रांचा उपयोग करूया. विद्यार्थ्यांचा शब्दसंग्रह वाढण्यासाठी सराव करून घेऊ या. | कार्डशिट, कलर स्केचपेन, ठळकचित्र लार्ज चित्र प्रतिमा इत्यादी | विद्यार्थी विविध रंगांची ओळख करून घेतील. विद्यार्थी चित्र रंगवून त्याचे वर्णन करतील. विद्यार्थ्यांना पक्षांच्या विविध अवयवांची ओळख होईल.<br>LOW VISION चे विद्यार्थी ठळक चित्रांची मदत घेतील. सरावाने त्यांचा शब्द संग्रह वाढेल. | विद्यार्थ्यांना विविध रंगाची ओळख होते. विद्यार्थी चित्र रंगवतात व आपल्या भाषेत वर्णन करतात. पक्षांची अवयवे अचूक ओळखतात.<br>ठळक चित्रांच्या मदतीने व विद्यार्थी रंगातील फरक ओळखतात. शब्दसंग्रह सरावाने काढतो. |
| ११ | | | ०२.०१.१४<br>०२.०१.१५<br>०२.०१.१६<br>०२.०१.१७ | श्रवण, भाषण, लेखन, वाचन, संभाषण | विद्यार्थ्यांना ठिपके जोडण्याची संधी देऊ या ज्यातून त्यांना शब्द शिडी तयार करतील. शब्द कोडे सोडविण्यासाठी प्रोत्साहित करू या. त्यांचा आत्मविश्वास वाढवून वैचारिक क्षमता विकसित होण्यासाठी सकारात्मक वातावरण निर्माण करूया स्थळ भेटीच्या वेळी वर्णन करूया. | कटआऊट, ठिपक्याची कात्रणे, फळांचे, प्राण्यांचे, पक्षाचे कटआऊट | विद्यार्थी स्वत: शब्द ओळखतील शब्दकोडी सोडवतील. दैनंदिनी आपल्या शब्दात मांडतील अनुभव सांगतील, विद्यार्थ्यांची वैचारिक क्षमता विकसित होईल व त्यांचा आत्मविश्वास वाढेल | विद्यार्थी स्वत: विचार करतात, अनुमान लावतात व निष्कर्ष काढतात, शब्दकोडी सोडवतात.<br>विद्यार्थ्यांची वैचारिक क्षमता विकसित होते. आत्मविश्वास वाढतो. |

## इयत्ता ३ री (मराठी)

| अ.क्र | दिव्यांग प्रवर्ग | अध्ययन शैली | अध्ययन निष्पत्ती क्रमांक | क्षमता | अध्ययन अनुभव | शैक्षणिक साहित्य | अध्ययनाची कृती / प्रतिसाद | अध्ययन अनुभवांची फलनिष्पत्ती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | 'अ' गटात येणारे दिव्यांग प्रवर्ग | बहु अध्ययन शैली | ०३.०१.०१ ०३.०१.०२ | श्रवण, भाषण, लेखन, वाचन | शिक्षक विद्यार्थ्यांना विविध गोष्टी, कथा, कविता, त्यांना समजेल अशा पद्धतीने समजावून सांगतील त्यातील आशयाचा अर्थ समजवतील कवितेत दडलेला आशय सोप्या भाषेत स्पष्ट करतील. वाचादोष विद्यार्थ्यांना कवितेतील कठीण स्वरांचा व शब्दांचा सराव करतील. कवितेतील वाक्यांचा चढ-उतार, थांबा याचा पुन्हा-पुन्हा विद्यार्थ्यांकडून सराव करून घेऊयात. समूहाने कविता तालासूरात म्हणून घेऊया. कथेतील पात्राचे नाट्यीकरण करून घेऊयात | विविध प्रकारच्या कविता असणारा संग्रह बालकथासंग्रह छोट्या छोट्या गोष्टींची पुस्तके | शिक्षकांनी सांगितलेली गोष्ट, कथा, कविता, विद्यार्थ्यांना समजेल व त्या अनुषंगाने विद्यार्थी त्यांची प्रतिक्रिया स्वभाषेत मांडतील. विद्यार्थी समर्पक उत्तरे देतील. वाचादोष विद्यार्थ्यांकडून कठीण शब्दांचा सराव करतील व उच्चारातील. पूर्णविराम असला की थांबावे हे समजावून देऊया. विरामचिन्हांचा जास्तीत-जास्त योग्य प्रकारे वापरण्याचा प्रयत्न करतील. कविता तालासूरात म्हणतील. नाट्यकीकरणात सहभागी होतील. | कविता ताला-सूरात म्हणतो. शब्द संग्रह वाढतो. विद्यार्थी समर्पक उत्तरे देतो. विरामचिन्हांचा वापर कोठे करावा हे समजते. भाषिक कौशल्याचा विकास होतो. वाचादोष विद्यार्थी देखील कविता म्हणतो. |
| २ | | | ०३.०१.०३ ०३.०१.०४ | श्रवण, भाषण, लेखन, वाचन | शिक्षक गोष्टी, कविता ऐकवतांना त्यातील विविध पात्र शीर्षक याविषयी चर्चा करण्यास प्रवृत्त करतात. विद्यार्थ्यांना विचार करण्यास प्रवृत्त करतात. त्यातच आपण त्यांना क्लू देवून या परिसरात घडणाऱ्या घटना/प्रसंग स्वत:च्या अनुभवांची जोड देत विद्यार्थ्यांना विचार करण्यास प्रवृत्त करतील.**उदा.**वादळ-वारा, मुसळधार पावसामुळे सर्वत्र पाणी. | कवितासंग्रह गोष्टींची पुस्तके घटना चित्रांचे २/३ मि.चित्रफीत वर्तमान पत्रातील एखादे घटना चित्र | विद्यार्थी समूहात कविता तालासूरात जास्तीत जास्त उत्तम प्रकारे म्हणतील. त्यांच्या आवडीची कविता ऐकवतील गोष्टीच्या आशयावर, पात्रांवर त्यांच्या क्षमतेनुसार मत मांडतील परिसरात घडलेल्या घटना/प्रसंग याविषयी सांगतांना स्वअनुभवाची जोड जोडतील. | आपले दिव्यांग विद्यार्थी देखील स्वभाषेत चर्चा करतील. कविता तालासूरात म्हणतो, अवांतर कविता म्हणतो. स्वानुभवाची जोड देवून घटना/प्रसंग व्यक्त करतो. |
| ३ | | | ०३.०१.०५ | श्रवण, भाषण, लेखन, वाचन | शिक्षक विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या गोष्टी, कविता ऐकवतील त्यावेळी त्यातील वेगळेपणा समजावून देवूया. उदा. बोधकथा कवितांमध्ये भारुड ओव्या व त्यातच स्वानुभवाची जोड देवूया. विद्यार्थ्यांना अनुभवाची सांगड घालतांना सहभागी करून घेतीलच. | गोष्टींची पुस्तके, पंचतंत्र, चंपक, भारूड, ओव्या इत्यादी | विद्यार्थी विविध प्रकारच्या गोष्टी समजून ऐकतील व स्वानुभवाची जोड देवून सहभाग घेतात व चर्चा करतात. | विद्यार्थी गोष्टी-गोष्टीतील वेगळेपणातील फरक समजतो. त्यामुळे विद्यार्थ्यांची शब्द संपत्ती, शब्दसाठा वाढतो. |

## इयत्ता ३ री (मराठी)

| अ.क्र | दिव्यांग प्रवर्ग | अध्ययन शैली | अध्ययन निष्पत्ती क्रमांक | क्षमता | अध्ययन अनुभव | शैक्षणिक साहित्य | अध्ययनाची कृती / प्रतिसाद | अध्ययन अनुभवांची फलनिष्पत्ती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | | | ०३.०१.०६<br>०३.०१.०७ | श्रवण, भाषण, लेखन, वाचन | विविध साहित्य प्रकार उपलब्ध करून त्याचे समजपूर्वक वाचन करण्यासाठी विद्यार्थ्यांना आवश्यक ती शैक्षणिक उपकरणे पुरवून त्याच्या क्षमतेनुसार वाव देवूया. निवडक कात्रण, गोष्ट, एखादा अनुभव शाळेच्या दर्शनी फलकावर लावण्यास प्रोत्साहित करूया. आपल्या विशेष बालकांना देखील परिपाठात सहभागी करून घेतील. | वर्तमानपत्र, बालसाहित्य, जाहिराती, गोष्टींची पुस्तके इ. | समजपूर्वक वाचन करण्याच प्रयत्न करतील. चर्चेतील विविध प्रश्नांची उत्तरे देतील. मित्रांसमवेत आपले विचार मांडतील, कात्रण गोळा करतील व परिपाठात सहभागी होतील. | विशष बालके त्यांच्या क्षमतेनुसार वाचन करतील व गरजेनुरुप सांकेतिक कृतीचा आधार घेतात. विद्यार्थ्यांचे संभाषण कौशल्य व आत्मविश्वास वाढतो. |
| ५ | | | ०३.०१.०८ | श्रवण, भाषण, लेखन, वाचन व संभाषण | सोप्याकडून कठीणाकडे ज्ञाताकडून अज्ञाताकडे आपण विद्यार्थ्यांना सहजपणे घेवून जातो व त्यात येणारे साहित्य प्रकार नविन शब्द यांचा अर्थ आपल्या भाषेत समजावून सांगतो. अर्थ सुनिश्चित करण्यास विद्यार्थ्यांना प्रेरणा देवून आपण सर्वच विद्यार्थ्यांच्या कल्पना शक्तीला वाव देवूया. | पाठ्यपुस्तक, फ्लॅशकार्ड, भाषापेटी | विद्यार्थ्यांच्या कठीण संकल्पना सोप्या करून विषयाचा अर्थ सहजपणे स्पष्ट होतो व टप्प्या-टप्प्याने विषय सहज समजतो. | अध्ययन अध्यापन तंत्राचा वापर केल्यामुळे पाठ्यपुस्तकात अवघड वाटणारे शब्द, संकल्पना या सहजपणे समजतात. नवीन शब्दांचा अर्थ कायमस्वरूपी स्मरणात राहतो. |
| ६ | | | ०३.०१.०९<br>०३.०१.१३ | श्रवण, भाषण, लेखन, वाचन व संभाषण, व्याकरण | विविध कथा व साहित्य प्रकारातील बारकावे विद्यार्थ्यांना समजवितांना उदाहरणाद्वारे नाम, सर्वनाम, वाक्यातील विरामचिन्ह स्वतंत्रपणे सांगून त्यांची पुनरावृत्ती करून घेतात. उदा. राम शाळेत जातो. राम डबा खातो, राम या नामाची पुनरावृत्ती न होता त्याऐवजी सर्वनाम वापरणे जसे तो डबा खातो यानुसार. | ठळक रंगसंगतीचा वापर करून वाक्याचे फ्लॅशकार्ड, शब्दचिठ्ठया, वाक्यपट्ट्या इत्यादी | विद्यार्थी प्राप्त झालेल्या ज्ञानावर आधारित विषयाचा अर्थ सहजपणे स्पष्ट होतो व टप्प्या-टप्प्याने विषय सहज समजतो. | मुलांना व्याकरणाचा वापर कोठे व कसा करावा हे ज्ञात होते. साहित्य वाचनाची आवड निर्माण होते. स्वभाषेतील स्वत:चा अनुभव लिहितो. |

## इयत्ता ३ री (मराठी)

| अ.क्र | दिव्यांग प्रवर्ग | अध्ययन शैली | अध्ययन निष्पत्ती क्रमांक | क्षमता | अध्ययन अनुभव | शैक्षणिक साहित्य | अध्ययनाची कृती / प्रतिसाद | अध्ययन अनुभवांची फलनिष्पत्ती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | | | ०३.०१.१०<br>०३.०१.१४ | श्रवण, भाषण, लेखन, निरीक्षण | चित्र पहा व व्यक्त व्हा अशा स्वरूपाचे विविध मजकूर उपलब्ध करून देवूया. चित्रात काय दिसते? यासारखे प्रश्न विचारून मुलांना अभिव्यक्त व निरीक्षण करण्यास संधी देवूया व त्यांच्या स्वभाषेत उत्तरे जाणून घेवूया. अंशत: अंध विद्यार्थ्यांसाठी लार्जप्रिंट च्या सहाय्याने चित्र वाचन व निरीक्षण करतील. | चित्रांचे कार्ड उदा. यात्रा, सहल, सण उत्सव, विविध कार्यक्रमाचे चित्र, भाषापेटी इत्यादी. | विद्यार्थी चित्रांचे निरीक्षण करून चित्रात नेमके काय दिसते? याचा अर्थबोध लावून स्वभाषेत व्यक्त होतात. स्वानुभवाच्या आधारे विद्यार्थी चर्चेत सहभागी होतात. आपले मत व्यक्त होतात. विशेष गरजा असणारे विद्यार्थी योग्य त्या शैक्षणिक साहित्यांचा वापर करून आपले मत व्यक्त करतील. | निरीक्षण क्षमता वाढते आपले मत व्यक्त करतांना आत्मविश्वास वाढतो.<br>वैचारिक क्षमता वाढते. |
| ८ | | | ०३.०१.११<br>०३.०१.१२ | श्रवण, भाषण, लेखन | शिक्षक शिकवितांना विद्यार्थी लक्षपूर्वक ऐकतात व त्यानुसार स्वभाषेत व्यक्त होतात. त्या अनुषंगाने शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पूर्ण स्वातंत्र्य देवून त्यांच्या आवडीचा विषय निवडण्यास सांगतील व त्यानुसार योग्य त्याठिकाणी मार्गदर्शन करून लेखन कौशल्य विकसित करून घेतीलच. लेखन करतेवेळी शब्दांची मांडणी त्याचा अर्थ योग्य पद्धतीने समजावतील. | विविध साहित्यांचे पुस्तके, वर्तमानपत्र | विद्यार्थी पुर्वानुभवाद्वारे आवडीचा विषय ऐकून त्यानुसार लेखन करून व्यक्त होण्यास प्रवृत्त होतील. उदा. गावाकडील यात्रा, सण, उत्सव यासारख्या विषयांवर आपल्या कल्पकतेने लेखनाची मांडणी करतील. | प्रत्यक्ष अनुभव व कृतीनुसार विद्यार्थी सहजपणे घडलेला प्रसंग लेखनातून व स्वभाषेतून तोंडी व्यक्त होतो. |



## इयत्ता ४ थी (मराठी)

| अ.क्र | दिव्यांग प्रवर्ग | अध्ययन शैली | अध्ययन निष्पत्ती क्रमांक | क्षमता | अध्ययन अनुभव | शैक्षणिक साहित्य | अध्ययनाची कृती / प्रतिसाद | अध्ययन अनुभवांची फलनिष्पत्ती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | 'अ' गटात येणारे दिव्यांग प्रवर्ग | बहु अध्ययन शैली | ०४.०१.०१<br>०४.०१.०२ | श्रवण, भाषण, लेखन, वाचन | मित्र, कुटुंबातील सदस्य यांच्याकडून ऐकण्यात आलेल्या गोष्टींबद्दल आपले मत व्यक्त करण्याची संधी उपलब्ध करून देऊया. ऐकलेल्या गोष्टीवर मित्रांना, कुटुंबातील सदस्य यांना प्रश्न विचारून व्यक्त होण्यास वाव देऊया. एखादी घटना अनुभव अंशत: अंध असणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांना काही घटनांचा अनुभव जवळून देऊ या. | गोष्टीची पुस्तके, अवांतर वाचन सामग्री | विद्यार्थी श्रवण करून त्यावर विचार व्यक्त करतो. इतरांना आपल्या स्व-भाषेत गोष्ट ऐकवतो. घेतलेले अनुभव स्वभाषेत सवंगडी/मित्र यांना ऐकवतो. | ऐकलेल्या माहितीबाबत आपले मत व्यक्त करतो. त्या माहितीबाबत स्वभाषेत किंवा प्रमाणित भाषेत प्रश्न विचारतो. |
| २ | | | ०४.०१.०३<br>०४.०१.०४ | श्रवण, भाषण, लेखन, वाचन | विद्यार्थ्यांना दृकश्राव्य साधने, वेगवेगळ्या प्रकारचे मनोरंजक साहित्य उपलब्ध करून देऊयात. | श्रवण साहित्य ठळक अक्षरातील छापील पुस्तके | विद्यार्थी दृकश्राव्य साधनांचा वापर करून कथा-कविता विषयी माहिती सांगतात व काव्य साहित्य मित्रासोबत तालासूरात व प्रत्यक्ष कृती करून म्हणतात. | अधिकाधिक अध्ययन अध्यापन करतांना दृकश्राव्य साधने वापरल्याने कविता व पाठांचा संबोध स्पष्ट होतो. |
| ३ | | | ०४.०१.०५ | श्रवण, भाषण, लेखन, वाचन | ठळक मजकूर व रंग-संगती असलेले वर्तमान पत्राचे कात्रण उपलब्ध करून देवू. सहल व क्षेत्रभेटीचे नियोजन करून दिव्यांग विद्यार्थ्यांचा सुद्धा सहभाग नोंदून घेऊयात. क्षेत्रभेटी दरम्यान पाहिलेल्या गोष्टींवर विद्यार्थ्यांना व्यक्त होण्यास प्रवृत्त करुयात. ऐकलेल्या गोष्टींवर प्रश्न विचारण्यास सांगू या. | वर्तमान पत्र छापील मजकुर कात्रण मोठे चित्र (उदा.सहल) | विद्यार्थी संवेदनशिलपणे प्रत्येक गोष्टीचा/ घटनेचा/ वस्तुचा प्रत्यक्ष अनुभव घेतो. उदा. नैसर्गिक वस्तू (पान, फुल, फळ इ.) मऊ-टणक, दु:ख, आनंद, हळहळ यासारख्या संकल्पना स्पष्ट होतात. | विद्यार्थ्यास सहली दरम्यान लहान-मोठे अनुभव अनुभवण्यास संधी मिळते. विद्यार्थी व्यक्त होतो. आपले विचार/ अनुभव सांगतो. |
| ४ | | | ०४.०१.०६ | श्रवण, भाषण, लेखन, वाचन | वाचलेला मजकूर व दैनंदिन अनुभव यांचा सहसंबंध किंवा सांगड घालून त्यातील संवेदन लेखी/तोंडी स्वरुपात मांडण्याची संधी उपलब्ध करून देवू. उदा. वर्तमानपत्रातील काही ठराविक घटना किंवा पुस्तकातली एखादी दु:खद घटना किंवा सुखद घटना याचा संबंध स्वत:ला आलेला प्रसंगाशी लावतो व स्वभाषेत व्यक्त होतो. | वर्तमान पत्र, अवांतर वाचन साहित्य (विविध पुस्तके, मासिके) | माझ्या गावाची यात्रा, हा मजकूर वाचला असता विद्याथी स्व अनुभव त्या मजकुराशी जोडतो व स्वत:च्या भाषेत व्यक्त होतो व अनुभव सांगतो. | विद्यार्थी सहसंबंध जोडून लेखी व तोंडी स्वरूपात आपले अनुभव कथन करतो व संवेदना मांडतो, वाचादोष असणारा विद्यार्थी सहभाग घेतो. |

## इयत्ता ४ थी (मराठी)

| अ.क्र | दिव्यांग प्रवर्ग | अध्ययन शैली | अध्ययन निष्पत्ती क्रमांक | क्षमता | अध्ययन अनुभव | शैक्षणिक साहित्य | अध्ययनाची कृती / प्रतिसाद | अध्ययन अनुभवांची फलनिष्पत्ती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | | | ०४.०१.०७ | श्रवण, भाषण, लेखन, वाचन | अवांतर वाचनातील इतर मजकुरांचे (बालसाहित्य) वर्तमानपत्रातील ठळक शीर्षक, प्रसिद्धी फलक, ठळक चित्रे) यांचे समज पूर्वक वाचन करण्यास प्रवृत्त करण्यास मदत होईल. | अवांतर वाचन साहित्य | अवांतर वाचनामुळे विद्यार्थी स्वतः स्वयंप्रेरणेने अधिकाधिक वाचन करतो व त्यांची गोडी वृद्धिंगत होते. अवांतर वाचनाचा आशय समजून घेईल | अवांतर वाचनाची आवड निर्माण होते. विद्यार्थी समजपूर्वक वाचन करतो व आपले मत मांडतो. साहित्य साधनांचा उपयोग करून अल्पदृष्टी विद्यार्थी वाचन करतो. (लो–व्हिजन किट्स) |
| ६ | | | ०४.०१.०८ | श्रवण, भाषण, लेखन, वाचन | साहित्य रचनेत आलेल्या नवीन शब्दांचा अर्थ स्पष्ट करणेबाबत वेगवेगळी उदाहरणे देवून आवश्यकतेनुसार आणि संदर्भानुसार आपली भाषा समजून घेण्याची व त्याचा वापर करण्याची संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आल्याने तो भाषण, लेखन, वाचनात त्याची गोडी निर्माण करूयात. | नवीन शब्दांच्या शब्द चिठ्ठ्या शब्दकोश | विद्यार्थी त्यास कठीण वाटणाऱ्या शब्दांचा अर्थ शिक्षकांनी दिलेल्या उदाहरणामधून सोप्या पद्धतीने शिकतात प्रसंगी शब्दकोशाचा उपयोग करतात. | विद्यार्थ्यांचा शब्दसंग्रह वाढतो. आपल्या भाषेत (वाक्यात) त्या नवीन शब्दांचा वापर करतो. |
| ७ | | | ०४.०१.०९<br>०४.०१.१० | श्रवण, भाषण, लेखन, वाचन | अवांतर वाचन करण्याची आवड निर्माण होण्यासाठी वर्गात वाचन कोपरा/ पुस्तकपेटी उपलब्ध असल्याने मुल पुस्तकातील आशयावर मित्रांसोबत व शिक्षकांसोबत चर्चा करतील. | वाचन कोपरा, पुस्तक पेटी, पुस्तकाचे नाव व प्रेरीत करणारे वाक्यांचा तक्ता | विद्यार्थी वाचलेल्या पुस्तकाबाबत आपसात चर्चा करतात. उदा. चित्र, पात्र, शीर्षक, घटना, आशय इत्यादीबाबत. अभिव्यक्त होण्याचे स्वातंत्र्य असल्याने विशेष बालक देखील आपल्या पद्धतीने व क्षमतेनुसार अभिव्यक्त होतो. | विशेष बालकास मला समजून घेतले जाते असा विश्वास निर्माण झाल्याने ते आपल्या क्षमतेनुसार चर्चेत सहभाग घेतील व आपले मत मांडतील. |

| अ.क्र | दिव्यांग प्रवर्ग | अध्ययन शैली | अध्ययन निष्पत्ती क्रमांक | क्षमता | अध्ययन अनुभव | शैक्षणिक साहित्य | अध्ययनाची कृती / प्रतिसाद | अध्ययन अनुभवांची फलनिष्पत्ती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | | | ०४.०१.११ ०४.०१.१२ ०४.०१.१३ | श्रवण, भाषण, लेखन, वाचन | विद्यार्थ्यास आपल्या स्तरानुसार दैनंदिन जीवनात भाषा, व्यवसाय, कला यामध्ये येणारे विषयाला अनुसरून शब्दांची पुनरावृत्ती करून अध्ययन अनुभव देण्याची संधी मिळाल्याने विद्यार्थी निर्भिडपणे व्यक्त होण्याचा प्रयत्न करतील. लेखी स्वरूपात व्यक्त होतांना व्याकरणातील बारकावे सजगपणे मांडण्याची संधी उपलब्ध करूया. उदा. मी पाहिलेला प्रसंग. मी चिमणी झाली तर, सूर्य उगवलाच नाही तर इ. (पान. नं.६४ प्रमाणे) | लेखनाचे आदर्श (वयानुरुप) नमुने माजी विद्यार्थ्यांनी केलेले लेखनाचे नमुने कथा लिहिण्यासाठी चित्रांचे कार्ड, चित्रांचे कटआऊट (पान नं.६४ प्रमाणे) | विद्यार्थी स्वयंकल्पनेने उताऱ्यात योग्य ठिकाणी विरामचिन्हांचा उपयोग करतील. दिव्यांग विद्यार्थी आवश्यक असल्यास लिखाण करतांना मित्रांची मदत घेतील. विद्यार्थी उपलब्ध लेखन सामग्रीचे विरामचिन्हांसह उताराचे निरीक्षण करून दिलेल्या उतारामध्ये योग्य त्या ठिकाणी चिन्हांचा वापर करून लेखन करतील. | विद्यार्थी व्याकरणिक दृष्ट्या योग्य लेखन करतांना लेखनातील बारकावे समजून घेतो व त्याचा योग्य वापर करतो. अचूक श्रूत लेखन करतो. |
| १० | | | ०४.०१.१४ ०४.०१.१५ ०४.०१.१६ ०४.०१.१७ ०४.०१.१८ | श्रवण, भाषण, लेखन, वाचन | विद्यार्थ्याला विषयाच्या आशयानु-सार कविता, गोष्टी, पत्र, याबाबतचे सुक्ष्मनिरीक्षणाद्वारे लेखन करून घेतील. लेखनात पूर्णविराम, स्वल्पविराम, प्रश्नचिन्ह यांचा जाणीवपूर्वक वापर करून देतील. उदा. एखादी शब्दमालिका देवून त्यावर गोष्टी किंवा कविता स्वभाषेत तयार करण्याची संधी देऊया. | शब्द चिठ्ठ्या, शब्द मालिका, लेखन साहित्य.उदा. पेन, पेन्सिल, खोड रबर इत्यादी | विद्यार्थ्यांनी स्वत:च्या इच्छेने शिक्षकांच्या सूचनेनुसार लेखनप्रक्रिया व लेखनाचे उद्दिष्ट्ये सहजतेने साध्य करतील. नवीन शब्दांचा अर्थ समजून आपल्या लेखनात योग्य त्या ठिकाणी त्याचा वापर करतील. | विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला वाव मिळतो, संधी मिळते, शब्दसंग्रह वाढतो. वैचारिक क्षमतेला वाव मिळतो. शब्दसंग्रहाचा उपयोग करून स्वभाषेत कविता, छोटी गोष्ट लिहितो. |





## इयत्ता ५ वी (मराठी)

| अ.क्र | दिव्यांग प्रवर्ग | अध्ययन शैली | अध्ययन निष्पत्ती क्रमांक | क्षमता | अध्ययन अनुभव | शैक्षणिक साहित्य | अध्ययनाची कृती / प्रतिसाद | अध्ययन अनुभवांची फलनिष्पत्ती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | 'अ' गटात येणारे दिव्यांग प्रवर्ग | बहु अध्ययन शैली | ०५.०१.०१ ०५.०१.०२ | श्रवण, भाषण, लेखन, वाचन | शिक्षकांची विद्यार्थ्यांसोबत एखाद्या घटनेवर आधारित नाट्यकीकरण करून घेतल्याने विद्यार्थी प्रत्यक्ष अनुभव घेतात तसेच त्या घटनेबाबत तर्क करतात व निष्कर्षापर्यंत पोहोचण्यासाठी मदत होईल. विशेष बालक देखील आपल्या क्षमतेनुसार सभोवताली घडलेल्या घटनेचे सुक्ष्म निरीक्षण करून व्यक्त होईल व ही संधी आपण त्यास देऊया. | प्रसंगचित्र | विद्यार्थी प्रत्यक्ष सहभाग घेतील व पात्रानुसार सादरीकरण करतील. विद्यार्थी प्रश्न विचारतील, तर्क लावतील व चर्चेअंती निष्कर्ष काढतील. विद्यार्थी सुक्ष्म निरीक्षणाद्वारे तोंडी प्रतिसाद देण्यास प्रवृत्त होतील. | विद्यार्थी घटनेशी एकरूप होऊन सादरीकरण करतात. घटनेचा आशय समजून घेऊन सुक्ष्म निरीक्षण करतात. स्वत:चे मत मांडतात. |
| २ | | | ०५.०१.०३ | श्रवण, भाषण, लेखन, वाचन | आवश्यकतेनुसार विद्यार्थ्यास आपली भाषा समजून घेण्याची व सुक्ष्म निरीक्षण करण्याची संधी मिळाल्याने विद्यार्थी स्वत:ची मौखिक भाषा तयार करतील त्याप्रमाणे विद्यार्थ्यांला आवडीनुसार वाचन साहित्य उपलब्ध करून देऊया. | भाषेची विविध पुस्तके (कथा, कविता इ.) | शिक्षकांनी संधी उपलब्ध करून दिल्यामुळे विद्यार्थी स्वत:ची मौखिक भाषा तयार करून मित्रांसोबत चर्चा करतांना त्याचा वापर करतील | विद्यार्थी अवांतर वाचन करण्यास प्रवृत्त होतो. वाचनाची गोडी निर्माण होते. विद्यार्थी स्वत:ची मौखिक भाषा विकसित करतात. |
| ३ | | | ०५.०१.०४ | श्रवण, भाषण, लेखन, वाचन (संभा-षण) | विविध प्रकारचे वाचनसाहित्य (उदा. वर्तमानपत्रे, बालसाहित्य, पोस्टर्स इ.) उपलब्ध झाल्याने त्यामधील संवेदनशील मुद्दे चर्चेसाठी घेऊया व त्यावर विद्यार्थ्यांना आपले मत मांडण्याची सूचना करू या. उदा. जनाईची कथा. | वर्तमानपत्र बालसाहित्य, पोस्टर्स | विद्यार्थी आशय व घटना समजून घेवून ते संवेदनपणे आपले मत मांडतील. चर्चेत सहभाग घेतील. प्रसंगानुरुप आपल्या भावना व्यक्त करतील, उदा. नाट्यकीकरण, कथाकथन) | संमिश्र वाचन अनुभवाने विद्यार्थी अधिक संवेदनशील होतात. आपल्या प्रासंगिक भावना व्यक्त करतात, विचार मांडतात, मत देतात. प्रसंगी विद्यार्थी मदतीसाठी धावून जातात. |
| ४ | | | ०५.०१.०५ | श्रवण, भाषण, लेखन, वाचन | शिक्षकांनी वेग-वेगळ्या परिस्थितीबाबत व विविध उद्देशासाठी विद्यार्थ्यांना वाचन साहित्य उपलब्ध करून दिल्याने व सदर साहित्य उपलब्ध होण्याचे स्त्रोत सांगितल्याने विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी निर्माण होऊन आवडीनुसार वाचन करतील. त्याचप्रमाणे | वर्तमान पत्रे, अहवाल माहिती पत्रिका, लघुकथा इ. | विद्यार्थी स्वयंप्रेरणेने वाचन करतील. विविध उद्देशांसाठी वाचन करतील. उपरोक्त वाचन साहित्यातून आपल्या भावना लिखित स्वरूपात मांडतील. उदा. सुख-दु:ख इ. | विद्यार्थी भिन्नपरिस्थितीबाबत माहिती घेतात व त्यावर आपले मत मांडतात. |

| अ.क्र | दिव्यांग प्रवर्ग | अध्ययन शैली | अध्ययन निष्पत्ती क्रमांक | क्षमता | अध्ययन अनुभव | शैक्षणिक साहित्य | अध्ययनाची कृती / प्रतिसाद | अध्ययन अनुभवांची फलनिष्पत्ती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | लेखनसुद्धा करतील. लेखनात गतीनिर्माण होईल. अक्षर सुधारण्यासाठी वाव मिळेल उदा. विद्यार्थ्यांना ढगफुटीची माहिती मिळविण्यास किंवा संकलित करण्यास सांगूया. | | | |
| ५ | | | ०५.०१.०६ | श्रवण, भाषण, लेखन, वाचन | पाठ्यपुस्तकाचे अध्ययन केल्याने विद्यार्थी इतर पुरक साहित्य समजपूर्वक वाचण्यास प्रवृत्त होतो. त्यास आवश्यक साहित्य उपलब्ध करून देऊया. | वर्तमानपत्रे, मासिके, बालसाहित्य इ. | विद्यार्थी स्वयंप्रेरणेने इतर साहित्याचे वाचन करतील.<br>त्यामधील आशय समजून घेतील व आपले विचार मांडतील. | विद्यार्थ्यास अवांतर वाचनाची आवड निर्माण होते. विद्यार्थी आशय समजून घेतात. |
| ६. | | | ०५.०१.०७ | श्रवण, भाषण, लेखन, वाचन | विद्यार्थ्यास अपरिचित शब्दांचे अर्थ शब्दकोशात शोधण्याची संधी उपलब्ध करून देऊया. | शब्दकोश, वाचनसाहित्य | विद्यार्थी वाचलेल्या आशयातील नवीन/ अपरिचित शब्द स्वत: शोधून त्याचा अर्थ शब्दकोशात शोधतील. | विद्यार्थी शब्दकोशाचा उपयोग स्वत: करतात. . |
| ७ | | | ०५.०१.०८ | श्रवण, भाषण, लेखन, वाचन | लेखनक्षमता वाढविण्यासाठी वारंवार श्रुतलेखन करण्याची संधी देऊया. लेखन करतेवेळी घटना, माहिती याला अनुसरून मुद्यांची व लेखनाची मांडणी करून लिखाणास प्रवृत्त करूयात. | उताऱ्याचे कात्रण, वर्तमान पत्र मासिक, पाक्षिक | विद्यार्थी श्रुत लेखनाद्वारे स्वत:चेच लेखन पडताळून पाहतात व आवश्यकतेनुसार बदल करतात. शालेय भित्तीपत्रिकेत स्वलेखन करतात. | विषयाच्या आशयानुसार स्वनिर्मिती लेखन करतो. आपल्या मित्राविषयीच्या प्रतिक्रिया, विचार इ. पत्रलेखनाद्वारे व्यक्त करतात. |
| ८ | | | ०५.०१.०९<br>०५.०१.१०<br>०५.०१.११ | श्रवण, भाषण, लेखन, वाचन | विद्यार्थ्यांची निरीक्षण क्षमता वाढविण्यासाठी भाषेतील बारकावे नियम इत्यादी विषयी त्यांच्या लेखनात प्रकट होण्याची संधी त्यांना देऊया. भाषेचे व्याकरण व त्यातील विविध घटक यांची मांडणी लेखनात कशी असावी याचा सहसंबंध सहज जोडून देण्यासाठी उदाहरण मांडण्याची संधी देऊया. विराम चिन्हांचा जाणीवपूर्वक वापराबाबत योग्य उदाहरणद्वारे संकल्पना स्पष्ट करूया. | व्याकरणाचे नियम व उदा. दर्शवणारे तक्ते | विद्यार्थी आशयाचे संदर्भाने भाषेचे बारकावे व नियमबद्ध मांडणी समजून घेऊन आपल्या लिखानात त्याचा उपयोग करतील. व्याकरणातील नियमांना समजून घेऊन विद्यार्थी लेखनात त्याचा योग्य उपयोग करतील. विरामचिन्हांचा योग्य उपयोग करतील. | विद्यार्थी व्याकरणाचे नियम समजून घेतात. त्या नियमांचे दैनंदिन व्यवहारात उपयोजन करतात. विद्यार्थ्यांचे लेखनकौशल्य विकसित होते. |

| अ.क्र | दिव्यांग प्रवर्ग | अध्ययन शैली | अध्ययन निष्पत्ती क्रमांक | क्षमता | अध्ययन अनुभव | शैक्षणिक साहित्य | अध्ययनाची कृती / प्रतिसाद | अध्ययन अनुभवांची फलनिष्पत्ती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | | | ०५.०१.१२<br>०५.०१.१३ | श्रवण, भाषण, लेखन, वाचन, संभाषण | विद्यार्थ्यांना इतर विषयांची भाषेशी सांगड घालण्यासाठी इतर विषयांमध्ये येणाऱ्या नवीन शब्दांचा उपयोग संदर्भानुसार वापर करण्यासाठी संधी उपलब्ध करून देऊया. विद्यार्थ्यांचा तोंडी अथवा लेखी प्रतिसाद घेतांना त्याला सर्व समावेशक विषय देऊया. उदा. महाराष्ट्रातील किल्ले, भारतीय कला इ. विषय लेखनासाठी देऊ या. | संकलित माहिती नमुने लेखन कौशल्याची उदाहरणे इत्यादी. | विद्यार्थी लेखी व तोंडी स्वरूपात व्यक्त होतांना इतर विषयांची सांगड घालतील. बोलतांना व लिहितांना नविन शब्दांचा उपयोग करतील अवांतर वाचन करतील. | विद्यार्थ्योची निरीक्षण क्षमता वाढते. विद्यार्थ्यांची भाषा अधिक समृद्ध होते विद्यार्थी अवांतर वाचन करतात. |
| १०. | | | ०५.०१.१४<br>०५.०१.१५ | श्रवण, भाषण, लेखन, वाचन, संभाषण | विद्यार्थ्यांना एखादा संवेदनशील विषय उदा. कोरोना काळातील परिस्थिती या विषयावर विद्यार्थ्यांचे मत जाणून त्यांना अभिव्यक्त करूया. पाठ्यपुस्तक आणि इतर संवेदनशील मुद्याला अनुसरून (नैसर्गिक सामाजिक) चर्चा करण्याची संधी उपलब्ध करून देऊया. | लिखित साहित्य | विद्यार्थी परिसरातील जवळील कुटुंबामध्ये कोव्हिड १९ संदर्भात घडलेल्या घटना लिखित स्वरूपात अनुभवाची जोड देऊन स्वभाषेत मांडणी करेल. कल्पनाशक्तीनुसार त्याला आवडेल तशा सोप्या भाषेत लिखाण करतो. | संवेदनशील विषयाबाबत विद्यार्थ्यांशी सहजतेने आपले मत, विचार, घडलेला प्रसंग व्यक्त करेल व लिखाण स्वरूपात आपले मत मांडतो. आवडीनुसार कथा, कविता तयार करतो. विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला वाव मिळून वैचारिक क्षमता वाढते. |


## इयत्ता १ ली (गणित)

| अ.क्र | दिव्यांग प्रवर्ग | अध्ययन शैली | अध्ययन निष्पत्ती क्रमांक | क्षमता | अध्ययन अनुभव | शैक्षणिक साहित्य | अध्ययनाची कृती / प्रतिसाद | अध्ययन अनुभवांची फलनिष्पत्ती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | 'अ' गटात येणारे दिव्यांग प्रवर्ग | बहु अध्ययन शैली | ०१.७१.०१ | गणन पूर्व तयारी | शिक्षकांनी १ ते २० आखलेल्या ब्लॉकवर विद्यार्थ्यांकडून उडी मारून कृती करून घेतील तसेच अस्थिव्यंग (व्यंग बघून) मुलांकडून शिक्षक १० वेळा वर व १० वेळा खाली असा हाताचा व्यायाम करून घेतील. शिक्षकांनी उच्चारलेल्या अंकांनुसार विद्यार्थी एकत्र येऊन अंक स्पष्टीकरण करून घेऊया. उदा.६,८,१२ इत्यादी. | १ ते २० पर्यंतचे अंकांचे फ्लॅशकार्ड मोजता येण्यासारख्या वस्तुंचे समावेश उदा. मणी, चेंडू, ठोकळे | विद्यार्थी शिक्षकांनी सांगितलेल्या सुचनांचे पालन करतील विद्यार्थी शिक्षकांच्या पाठोपाठ अंक वाचन करतील. विद्यार्थी सांगितलेल्या संख्येनुसार गट तयार करतील. | विद्यार्थ्याला कृतीमुळे शारीरिक व्यायाम होतो. विद्यार्थ्यांना कृतीमुळे आकड्यांविषयी तोंड ओळख होते. विद्यार्थी गणन क्रियेकडे वळतो. |
| २ | | | ०१.७१.०२ | अवयवांची ओळख (लहान-मोठे) | शिक्षक विद्यार्थ्यांना लहान-मोठ्या आकाराच्या चित्राद्वारे लहान मोठेपणा दाखवतील. शिक्षक विद्यार्थ्यांना भिंतीवरच्या मोठ्या व हातावरील लहान घड्याळ दाखवून लहान मोठ्या आकारांची ओळख करतील. | चेंडू, घड्याळ, एकाच प्राण्याच्या लहान मोठ्या प्रतिकृतीचे चित्र | विद्यार्थी शिक्षकांच्या मदतीने लहान मोठा आकार ओळखतील.<br>उदा. लहान चेंडू, मोठा चेंडू | विद्यार्थ्यांला लहान, मोठ्या आकारातील फरक समजतो. |
| ३ | | | ०१.७१.०१<br>०१.७१.०४ | गणन | शिक्षक विद्यार्थ्यांकडून मणी, आगपेटीच्या काड्या, आईस्क्रीमच्या काड्या मोजून घेतील. शिक्षक अंकांचे फ्लॅशकार्ड दाखवून विद्यार्थ्यांकडून उच्चारून घेतील. चित्राच्या किंवा वस्तुंच्या सहाय्याने शिक्षक विद्यार्थ्यांकडून १ ते ९ अंकाची किंमत समजातवतील. | मणी, आगपेटीच्या काड्या, अंकांचे फ्लॅशकार्ड, फुले, पेन्सिल | विद्यार्थी शिक्षकांच्या मदतीने आईस्क्रीमच्या काड्या मोजतील. विद्यार्थी मित्र व वस्तूच्या सहाय्याने १ ते ९ अंकांची किंमत समजतील. | १ ते २० अंक विद्यार्थी उच्चारतो व १ ते ९ अंकांची किंमत कळते. |
| ४ | | | ०१.७१.०५ | | शिक्षक विद्यार्थ्याला आपल्या घरातील सदस्य विचारून कमी व जास्त यातील फरक समजावून सांगतील.<br>शिक्षकांनी दोन विद्यार्थ्यांना ३, ५ चॉकलेट ठेवून कमी-जास्त संकल्पना समजावतील.<br>शिक्षक विद्यार्थ्यांना कमी मण्यांची माळ व जास्त मण्यांची माळ देऊन फरक सांगतील. | जोडो बॉक्स, मण्यांच्या माळा (कमी जास्त) | विद्यार्थी घरातील सदस्य संख्या सांगतील. चॉकलेटच्या किंवा विविध वस्तूच्या साहाय्याने कमी जास्त ही संकल्पना समजतील. विद्यार्थी माळेतील मणी (लहान व मोठ्या) मोजून फरक समजून घेतील. | विद्यार्थी कमी व जास्त संख्या ओळखतात. विद्यार्थ्यांची निरीक्षण क्षमता वाढली. विद्यार्थी लहान मोठ्या माळेतील तुलना करतात. |

## इयत्ता १ ली (गणित)

| अ.क्र | दिव्यांग प्रवर्ग | अध्ययन शैली | अध्ययन निष्पत्ती क्रमांक | क्षमता | अध्ययन अनुभव | शैक्षणिक साहित्य | अध्ययनाची कृती / प्रतिसाद | अध्ययन अनुभवांची फलनिष्पत्ती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | | | ०१.७१.०६<br>०१.७१.०७ | मिळ-विण्याची क्रिया | गोष्ट पद्धतीचा वापर करून मिळविण्याची क्रिया समजून घेऊया उदा. माझ्याकडे २ लाडू आहेत आणि आईने मला ३ लाडू दिले तर माझ्याकडे एकूण ५ लाडू झालेत. एका हाताची बोटे ५ त्यात दुसऱ्या हाताचे ३ बोटे मिळविले तर एकूण ८ बोटे झाले. ही क्रिया विद्यार्थ्यांना समजावून देऊ या.<br>फूल देऊन त्यातील पाकळ्या व दुसऱ्या फुलाच्या मिळून मिळणारी संख्या समजावूया. ५+४ =९ | लाडू, चेंडू, फुले व पाकळ्या ठोकळे | विद्यार्थी लाडूंची संख्या सांगतील.<br>विद्यार्थी स्वत:च्या हाताची बोट १ ते ५ उच्चार करून मोजतील. विद्यार्थी फुलांच्या पाकळ्या (दोन्ही) मोजतील. | विद्यार्थी लाडूची सरंख्या मिळवून ओळखतात. विद्यार्थी हाताची (दोन्ही) बोटे मोजून एकूण संख्या सांगतात. फुलाच्या पाकळ्या मिळवून सांगतात. |
| ६ | | | ०१.७१.०८<br>०१.७१.०९ | कमी करण्याची संख्या | बेडकाचे उदा.घेऊन कमी करण्याची क्रिया शिकूया उदा. नदी काठी बसलेल्या बेडकांमधून (५) एका बेडकाने पाण्यात उडी मारली. उरलेले बेडूक किती उत्तर - ४<br>एका संख्येतून दुसरी संख्या कमी करण्यासाठी हे(-) वजाबाकीचे चिन्ह वापरतात. शिक्षक समजावतील व उदा घेऊया उदा. फुगविलेल्या ८ फुग्यांमधून ३ फुगे उडाले उरले ५ ठोकळे जोडून व काढून (१ ते ९) बेरीज व वजाबाकीची प्रश्नोत्तरे समजून घेऊया. | बेडकांचे चित्रे, फुगे, जोडो ब्लॉक पेन्सील, पेन, मणी, गोट्या. | विद्यार्थी नदी काठावर बसलेल्या बेडकांचे गणन करतील व पाण्यात पडलेला बेडूक कमी करतील. विद्यार्थी लक्षपूर्वक(-) चिन्ह निरीक्षण करतील. विद्यार्थी फुग्यांचे गणन करून उडलेले फुगे वेगळे करतील. | विद्यार्थी समूहातून कही वस्तू बाजूला काढतात व उरलेल्या संख्येचा निष्कर्ष लावतात.<br>विद्यार्थ्यांची निरीक्षण क्षमता वाढते.<br>विद्यार्थी उरलेल्या फुग्यांचे निष्कर्ष काढतात. वि.शि. जोडलेल्या व कमी केलेल्या संख्यांचा निष्कर्ष लावून बेरीज व वजाबाकीचे (शिक्षकांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देतात.) |
| ७ | | | ०१.७१.१० | संख्या ओळख | विद्यार्थी मित्रांनो दशकांच्या (१०माळ) ५ मण्यांच्या ५ माळांच्या मदतीने संख्या ओळखूया व लिहूया. संख्येच्या तोरणाच्या मदतीने अंक ओळखूया व लिहूयात उदा. ११ १२ १३ १४ १५ १६ १७ १८ १९--२१ २२ २३ २४ २५ २६ --२८ २९ ३० रिकाम्या जागी संख्या कोणती येईल हे पाहूया. उदा: दहा मण्यांची एक माळ व सुट्टे सहा मणी असे एकूण १६ मणी | मण्यांच्या (दशक) माळा १ ते ९० पर्यंतच्या वेगवेगळ्या आकाराची १०,१० च्या तोरणे, जोडो ब्लॉक, ठोकळे, आगपेटीच्या काड्या, मण्यांच्या माळा व सुटे मणी | विद्यार्थी मण्यांच्या माळांतील मणी मोजून उच्चारतात. विद्यार्थी तोरणातील वेगळेपणामुळे उत्साही होऊन संख्या ओळखतात व रिकाम्या असलेल्या तोरणातील संख्या ओळखतात. | विद्यार्थी मण्यांच्या माळांतील मणी उच्चारून वहीवर अंकात लिहितात.<br>विद्यार्थी तोरणातील संख्या मोजून पाहून दहा-दहाच्या ओळीने लिहितात.<br>विद्यार्थी रिकाम्या जागी असलेला अंक ओळखतात व लिहितात. |

## इयत्ता १ ली (गणित)

| अ.क्र | दिव्यांग प्रवर्ग | अध्ययन शैली | अध्ययन निषत्ती क्रमांक | क्षमता | अध्ययन अनुभव | शैक्षणिक साहित्य | अध्ययनाची कृती / प्रतिसाद | अध्ययन अनुभवांची फलनिष्पत्ती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | | | ०१.७१.११ | आकृती बंध | चला तर मग आज आपण संख्या आकार शिकूया.<br>आपण क्रमाने कोणता आकार येतो तो पाहूया.<br>त्याचप्रमाणे आपल्या संख्येचे ज्ञान आहे म्हणून एकानंतर एक कोणती संख्या येते ते पाहू या १, २, ३, ४, ५, ६, ७, ८..... नरीक्षण करुयात व त्यापुढे कुठली संख्या येते ते पाहूया.<br>२ ३ २ ३ २ ३ | भौमितिक आकृत्यांचे ठोकळे अंकांचे ठोकळे फ्लॅशकार्ड, अंकांची पेटी, अंक लिहीलेली चित्रे.<br>भौमितीय ठोकळे, त्रिकोण, चौकोन, गोल पानांची पट्टी (उलट-सुलट) अंकांचे फ्लॅश कार्ड | विद्यार्थी उभ्या, आडव्या, तिरकस, गोलाकार रेषांचे निरीक्षण करतो व आकृती काढण्याचा प्रयत्न करतात. विद्यार्थी भौमितीक ठोकळ्यांच्या मदतीने येणारा योग्य क्रम लावण्याचा प्रयत्न करतात. विद्यार्थी त्रिकोणानंतर कोणता आकार येतो ह्यांचे निरीक्षण करतात. विद्यार्थी कोणत्या अंकानंतर कोणता अंक येतो हे वाचतात पानांची रचनेचे निरीक्षण करतात. | विद्यार्थी वहीवर त्रिकोण, चौकोन, गोल आकार स्वत: काढतो. विद्यार्थी आकृतीबंधाचे निरीक्षण करून पुढील आकृतीबंध वहीवर/पानावर निर्मिती करतात/काढतात. विद्यार्थ्यांची निरीक्षण क्षमता वाढते व अंक योग्य क्रमाने लिहीतात. पानांचा आकार लक्षात घेऊन त्यानंतर येणारे पान त्यापुढे काढतात. |
| ९ | | | ०१.७१.१२ | शाब्दिक उदाहरणे सोडविणे | शिक्षक विद्यार्थ्यांना फ्लॅशकार्ड वरील अंक दाखवतात व त्यावरील कुठले चित्र आहे ते कोठे असतात. चला शोधू या. उदा. बस बसस्थानक अथवा रस्त्यावर धावतांना दिसते डॉक्टरचे, विदुषकाचे चित्र दाखवतात व हे व्यक्ती कुठे आढळतात पाहूयात.<br>पाळणे कोठे आढळतात पाहूया. | चित्रांचे अंकांचे फ्लॅशकार्ड, लार्ज प्रिंट असलेली चित्रे, पाळण्याची चित्रे इत्यादी | विद्यार्थी अंक पाहून त्यापुढे असलेल्या चित्राचे तर्क करतात. बसचे चित्र पाहून ते कोठे असतात ते मित्रांसमवेत चर्चा करतात. डॉक्टरचे चित्राचे निरीक्षण करून त्याचे तर्क काढतात. पाळण्याचे चित्र पाहून तर्क-वितर्क लावतात. | विद्यार्थी बस बसस्थानकावर असतात. रस्त्यावर धावतात ह्याचे तर्क लावतात. डॉक्टर दवाखान्यात असतात. ह्याचे अनुमान लावतात. यात्रेच्या ठिकाणी पाळणे असतात. विदुषक असतो हे अनुमान लावतात. |
| १० | | | ०१.७१.१३ | शुन्याची संकल्पना | चला तर आज आपण शून्य(०) समजून घेऊयात शिक्षक विद्यार्थ्यांना विविध उदा. देऊन शून्य समजावतात. उदा. शून्य (०) ला किंमत नसते परंतू त्यापुढे अंक ठेवला तर त्याला किंमत प्राप्त होते.<br>उदा. ०, १०, २०, ३०, ४०, ५० | शून्य (०) चे फ्लॅशकार्ड अंकांचे फ्लॅशकार्ड वस्तूंचे फ्लॅशकार्ड | शिक्षकांनी दिलेल्या शून्य(०) चे विद्यार्थी निरीक्षण करतात. त्यापुढे वेगवेगळ्या अंकांचे फ्लॅशकार्ड लावतात. १०, २०, ३०, ४०. | विद्यार्थ्यांना शुन्याची संकल्पना समजून घेतात. शुन्यापुढे विविध अंक लावून संख्या उच्चारतात व समजतात. |

# इयत्ता २ री (गणित)

| अ.क्र | दिव्यांग प्रवर्ग | अध्ययन शैली | अध्ययन निष्पत्ती क्रमांक | क्षमता | अध्ययन अनुभव | शैक्षणिक साहित्य | अध्ययनाची कृती / प्रतिसाद | अध्ययन अनुभवांची फलनिष्पत्ती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | 'अ' गटात येणारे दिव्यांग प्रवर्ग | बहु अध्ययन शैली | ०२.७१.०१ | संख्याज्ञान | ९९ पर्यंतच्या अंकांच्या फ्लॅशकार्डच्या सहाय्याने अंक वाचन करून घेतील. | अंकांचे फ्लॅशकार्ड, तक्ता | अंकांचे फ्लॅशकार्ड/चार्ट बघून वाचन व लेखन करतील. | विद्यार्थी त्यांच्या क्षमतेनुसार अंकवाचन करतो अंक लेखन करतो |
| | | | | | उदा. तक्त्यातील रिकाम्या जागेतील अंक वाचन करून घेतील. ५० पर्यंतचे अंक अक्षरात फ्लॅशकार्ड बघून लिहून घेतील | अंकी व अक्षरी अंकाचा तक्ता | अंकांचे व अंकांचे फ्लॅशकार्ड/चार्ट बघून वाचन व लेखन करतील. | |
| | | | | | उदा. फुलांच्या चित्रातील पाकळ्यांवरील अंक वाचन व लेखन करून घेऊ या. | फुलाची प्रतिकृती | प्रत्यक्ष फुलांच्या प्रतिकृती दाखवतील. | |
| | | | | | प्रत्यक्ष वस्तू, अंक यांच्या साहाय्याने स्थानिक किंमतीचा उपयोग व सहसंबंध जोडून लहान-मोठी संख्या समजावूयात. | मणी, फुले, गणित पाटी आईस्क्रीम काड्या | अंक व वस्तुंच्या जोड्या जुळवतील वस्तुंच्या सहाय्याने लहानमोठेपणा दाखवतील. | अंकांची स्थानिक किंमत समजते लहान-मोठेपणा ओळखतो. |
| | | | | | दोन गटातील वस्तू एकत्र करणे व त्या मिळवणे म्हणजेच बेरीज आहे व विद्यार्थ्यांकडून मोजून घेवूया. उदा. दोन रंगाचे मणी एकत्र करून मोजून घेतील. ०००+०००=६ | रंगीत मणी | मणी एकत्र करून मोजतील | एक १ मिळवणे बेरीज समजते |
| | | | | | उदा. दोन प्रकारचे चॉकलेट एकत्र करून मोजून घेतील. | दोन प्रकारचे चॉकलेटस् | | |
| | | | | | उदा. १२ चॉकलेटस् मधून २ चॉकलेट मित्राला दिले म्हणजे, कमी म्हणजेच वजाबाकी अशाप्रकारच्या उदाहरणाची जोड देवूया. वेगवेगळ्या किमतीच्या नाणी-नोटांची ओळख करून देऊया त्यासाठी प्रत्यक्ष नाणी-नोटा हाताळावयास देवू. | चॉकलेट नाणी-नोटा | एकूण वस्तूंपैकी वस्तू कमी होणे म्हणजे वजाबाकी समजली. वेगवेगळ्या नाणी व नोटा यांची वेगवेगळी किंमत समजेल निरीक्षणाद्वारे नोटांमधील फरक ओळखता येतो. | वजाबाकी क्रिया समजले नाणी-नोटा ओळखतो. |

## इयत्ता २ री (गणित)

| अ.क्र | दिव्यांग प्रवर्ग | अध्ययन शैली | अध्ययन निषत्ती क्रमांक | क्षमता | अध्ययन अनुभव | शैक्षणिक साहित्य | अध्ययनाची कृती / प्रतिसाद | अध्ययन अनुभवांची फलनिष्पत्ती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | | | ०२.७१.०२ | भौमितिक आकाराची ओळख | त्रिमितीय आकार व द्विमितीय आकार यांचे वैशिष्ट्ये स्पष्ट करणे. | घन, दंडगोल, शंकू, गोल, प्रत्यक्ष वस्तु त्या पद्धतीच्या आकारांच्या | विद्यार्थी त्रिमितीय आकार व द्विमितीय आकारांच्या वैशिष्ट्यांनुसार कागदापासून वस्तू तयार करतो व सभोवताली असणाऱ्या वस्तुंशी/आकारांशी सहसंबंध लावतो. | विद्यार्थी स्वनिर्मित वस्तूंच्या आकारानुसार विदुषकाची टोपी तयार करतो. (शंकू आकार) पाण्याच्या बटलीचा आकार दंडगोल आहे हे त्याला स्पष्ट झाले उदा. गॅस सिलेंडर. |
| | | | | | उदा: घनाकृती आकाराच्या अनेक वस्तू विद्याथर्यांसमोर ठेवूया व त्यांना भौमितिक आकारांची नावे ओळखण्यास सांगू या. त्रिमितीय आकार व द्विमितिय आकार हे वस्तुंच्या सहाय्याने स्पष्ट करूया. | ठोकळे, आयात, चौकोन, त्रिकोण, वर्तुळाचे कटआऊट | | |
| ३ | | | ०२.७१.०३<br>०२.७१.०४ | भौमितिक आकार | विद्यार्थ्यांना फलकवर रेषा काढण्यास सांगू या. फळ्यावर दोन टिंब ठराविक अंतरावर मांडणे व सरळ रेषेत त्यांना जोडण्याची कृती विद्यार्थ्यांकडून करून घेऊया.<br>कागदाची घडी घालून उभी, आडवी, तिरपी रेषा प्रात्यक्षिक करून घेऊया. अंशत: अंध विद्यार्थ्यांना ठळक स्केचपेनाचा वापर करून कृती करून घेऊया. | घोटीव कागद, दोरा, खडू, फलक, पट्टी, स्केचपेन, कंपासपेटी इत्यादी | विद्यार्थी साहित्याचा वापर करून सरळ रेषा, आडवी रेषा, तिरपी रेषा मधील फरक समजून सांगितलेल्या प्रमाणे कृती करतो. | विद्यार्थी साहित्य साधनांचा वापर करून सरळ, तिरप्या, आडवी रेषा काढून ओळखतो. |
| ४ | | | ०२.७१.०५ | भौतिक गुणधर्म | घसरगुंडीवर वस्तूचा सपाट पृष्ठभाग ठेवल्यास ती वस्तू घसरते व वक्र पृष्ठभाग ठेवल्यास ती वस्तू घरंगळते हे दंडगोलाच्या मदतीने छान समजूया उदा. चेंडू कडाही व कोपराही नाही पृष्ठभाग सपाट नाही म्हणून तो सतत घरंगळतो असे समजूया. | दंडगोल, चेंडू, पाटी | विद्यार्थ्यास घरंगळणाऱ्या घसरणाऱ्या वस्तू प्रत्यक्ष हाताळल्यामुळे त्यांचा गुणधर्म लक्षात येतो. विद्यार्थीही स्वयंप्रेरणेने इतर उदाहरण सांगतील. विद्यार्थी वस्तूंची यादी करतील व चित्र व नाव यांच्या जोड्या जुळवतील. | विद्यार्थ्याला घसरणे व घरंगळणे हे भौतिक गुणधर्म अर्थपूर्ण समजले. |
| ५ | | | ०२.७१.०६ | मापन | विद्यार्थ्यांना वस्तुची लांबी मोजण्यासाठी स्वत:च्या हाताचा वितचा वापर करून वस्तूंची लांबी मोजण्यास सांगूया. व त्यानुसार अंदाज लावूया. | टेबल, फुटपट्टी | विद्यार्थी प्रत्यक्ष टेबलची लांबी हाताच्या विताने सहाय्याने मोजतील. | अप्रमाणित मापन विद्यार्थी करू शकतात. |

## इयत्ता २ री (गणित)

| अ.क्र | दिव्यांग प्रवर्ग | अध्ययन शैली | अध्ययन निष्पत्ती क्रमांक | क्षमता | अध्ययन अनुभव | शैक्षणिक साहित्य | अध्ययनाची कृती / प्रतिसाद | अध्ययन अनुभवांची फलनिष्पत्ती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | | | ०२.७१.०७ | जड आणि हलके तुलनात्मक | विद्यार्थ्यांना शिकवितांना वस्तू मोजण्यासाठी वजन काट्याचा वापर करू या प्रत्यक्ष वस्तूचे वजन वेगवेगळे असते हे कृतीने पटवून देऊ या. | वजनकाटा, वेगवेगळ्या वस्तू | वजन काट्यामुळे वस्तुंचे जड हलकेपणा समजणे सोपे जाते त्याप्रमाणे दोन वस्तूंमधील तुलना करण्यास शिकेल. | दैनंदिन जीवनात या कृतीचा उपयोग करतो. |
| ७ | | | ०२.७१.०८ | कालमापन (दिन-दर्शिका) | प्रत्यक्ष दिनदर्शिका ठेवून आठवड्यात किती वार आहेत हे विद्यार्थ्यांना विचारून घेऊया. फ्लॅशकार्डच्या साहाय्याने बारा महिन्यांची नावे उच्चारून घेऊ या. | कॅलेडर, वार, महिन्याचे चक्र | दिनदर्शिकेचा उपयोग करून आठवड्याचे वार बोलतील. दिनदर्शिकेचा उपयोग करून महिन्यांची नावे बोलतील. वार व महिने क्रमाने लावतील. | विद्यार्थ्यास त्याच्या दैनंदिन व्यवहारात वार व महिन्यांचा उपयोग होईल. |
| ८ | | | ०२.७१.०९ | कमी जास्तच्या पटीने | शिक्षक तुलनात्मक उदाहरण अनुभवातून देतात. एकास एक संगती जोडून च्यापेक्षा कमी व च्यापेक्षा जास्त संकल्पना स्पष्ट करण्यास मदत करतील. उदा. अंजीलीपेक्षा समीरकडे जास्त पेन्सिल आहेत. | शाब्दिक उदा दोन चित्र व त्यातील फरक | दोन चित्रांमधील फरक ओळखून निरीक्षण करून कोणत्या चित्रात जास्त वस्तू व कोणत्या चित्रात कमी वस्तू आहेत. याचे सुक्ष्म निरीक्षणाद्वारे फरक ओळखतील. उदा. एका चित्रात दहा (१०) फुले व दुसऱ्या चित्रात (२०) फुले यातील कमी जास्त फुलांची संख्या समजून घेतील. | विद्यार्थ्यांना च्यापेक्षा कमी व च्यापेक्षा जास्त, वस्तू संख्या कळतात. |
| ९ | | | ०२.७१.१० | नाणी व नोटा यांची ओळख | नाणी व नोटा यांचा प्रत्यक्ष अनुभव देऊन प्रत्येक नाणीच्या किंमतीनुसार उदा. एक रुपया, दोन रुपया, पाच रुपया, दहा रुपया, स्पर्श, त्याचा आकार, जाडी, उठावाचे चिन्ह यानुसार प्रत्यक्ष नाणी हातात देऊन अनुभव देऊ या. उदा. १०रु, २० रु, ५०रु, १००रु., २००रु., ५००रु., २०००रु. प्रत्येक नोट त्याचा स्पर्श, आकार, जाडी ही किंमतीप्रमाणे कशी ओळखावी याचे प्रात्यक्षिक अनुभव देऊया. | प्रत्यक्ष नाणी, नोटा | विद्यार्थी नाणी व नोटा हे स्पर्श, आकार, रंग, जाडी व त्यावरील किंमतनुसार ओळखतील या नाणी व नोटांचा त्याच्या दैनंदिन व्यवहारात उपयोग करेल.<br>उदा. १ रु = १ चॉकलेट<br>२ रु. = २ चॉकलेट<br>५ रु.= १ बिस्कीट पुडा,<br>१० रु. = कॅटबरी<br>यानुसार व्यवहारात उपयोग करतील.<br>उदा. किराणा दुकानातील व्यवहार | १) नाणी व नोटा यांची किंमत कळेल.<br>२) दैनंदिन व्यवहारात नाणी व नोटा यांचा उपयोग करतो.<br>३) ठराविक वस्तू व नाणी यांचा सहसंबंध दैनंदिन व्यवहारात जोडतो. |

## इयत्ता ३ री (गणित)

| अ.क्र | दिव्यांग प्रवर्ग | अध्ययन शैली | अध्ययन निष्पत्ती क्रमांक | क्षमता | अध्ययन अनुभव | शैक्षणिक साहित्य | अध्ययनाची कृती / प्रतिसाद | अध्ययन अनुभवांची फलनिष्पत्ती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ‘अ’ गटात येणारे दिव्यांग प्रवर्ग | बहु अध्ययन शैली | ०३.७१.०१ | संख्या-वरील क्रिया बेरीज व वजाबाकी | शिकवितांना विद्यार्थ्यांना किंमतीचे स्थान शिकवून त्यानुसार उदाहरण देणे.<br>उदा. १००, १०, १ यानुसार चे स्थान एकक, १० चे स्थान दशक, १०० चे स्थान शतक म्हणजेच विद्यार्थ्याकडून स्थानिक किंमतीचा उल्लेख करून लिहिण्यास सांगू या. तीन अंकांची बेरीज शिकूया त्यात सोप्याकडून कठीणा-कडे या अध्यापन तंत्राचा वापर करून बीन हातच्याची बेरीज यावरील उदाहरण सोडवूयात.<br>शतक दशक एकक<br>३ २ ४<br>३ १ २<br>६ ३ ६<br>यानुसार विश्लेषण करून योग्य संख्यांवरून योग्य क्रिया करूया. | अंकांचे फ्लॅश कार्ड, मणी माळ, फुले, पाने, दगड, गोट्या | विद्यार्थी साहित्यांचा वापर करून स्थानिक किंमती समजून घेतील व साहित्याचा वापर करून बेरीज करतील. विद्यार्थ्यांना साहित्यांचा वापर करून बेरीज करण्याची क्रिया करतील. | विद्यार्थी स्थानिक किंमत समजून घेतील. विद्यार्थ्यांना बेरीज म्हणजे एका संख्येमध्ये दुसरी संख्या मिळविणे हे समजते. त्याचप्रमाणे हातच्याची बेरीज हे शैक्षणिक साहित्याचा वापर करून करतील. |
| २ | | | ०३.७१.०१ | भागाकार | भागाकार: भागाकार म्हणजे समान वाटप किंवा समान भाग होय.<br>भाज्य = भागाकार x भाजक + बाकी हे सूत्र भागाकारात वापरायचे असते. या पद्धतीने भागाकार समजून घेऊयात.- चिन्हाची ओळख करून पूर्ण भाग जाणारी उदाहरणे कोणती ते फलकावर किंवा वहीवर लिहिण्यास सांगूया. विद्यार्थ्यांकडून प्रत्यक्ष कृती वस्तूंच्या माध्यमातून करून घेऊयात.<br>उदा: ३ ÷ १२ = ४ पूर्ण भाग जाणारी संख्या त्याचपद्धतीने पूर्ण भाग न जाणारी संख्या जसे<br>उदा: ३ ÷ ११ = ९ शिल्लक बाकी २ यानुसार | लहान ठोकळे पान, फुले गणित पेटी तसेच गरजेनुरुप शैक्षणिक साहित्य. | विद्यार्थी साहित्याचा वापर करून पूर्ण भाग जाणारी उदाहरणे फलकावर किंवा वहीवर सोडवतील. | भागाकार ही क्रिया सोडविण्यासाठी विद्यार्थी पाढे पाठ करून व सराव करून उदाहरणे सोडवतील. |

## इयत्ता ३ री (गणित)

| अ.क्र | दिव्यांग प्रवर्ग | अध्ययन शैली | अध्ययन निष्पत्ती क्रमांक | क्षमता | अध्ययन अनुभव | शैक्षणिक साहित्य | अध्ययनाची कृती / प्रतिसाद | अध्ययन अनुभवांची फलनिष्पत्ती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | | | ०३.७१.०२ | द्विमितीय आकार | द्विमितीय वस्तु म्हणजे लांबी व रुंदी दोन मिती असलेली वस्तू म्हणजे द्विमितीय होय. कडा कोपरे आणि कर्णाच्या संख्येवरून द्विमितीय आकाराचे वर्णन करूया. उदा. पुस्तकाचे, वहीचे कव्हर दाखवून त्याचे चार कडा, कोपरे, दोन कर्ण असे समजावून सांगूयात | प्रत्यक्ष पुस्तक, वही | विद्यार्थी साहित्यांच्या आधारे द्विमितीय आकार समजून घेतील. | द्विमितीय आकार विद्यार्थ्यांना समजेल. |
| ४ | | | ०३.७१.०३ | मापन (अंतर) | पट्टी किवा टेपच्या साहाय्याने वर्गातील वस्तूंची लांबी मोजून त्या अंदाजाने पडताळा घेऊयात. उदा. फळ्याची रूंदी टेपच्या साहाय्याने मोजूया. टेबलची रुंदी व लांबी पट्टी किंवा टेपच्या सहाय्याने मोजूया. कमी अंतर मोजण्यासाठी पट्टीचा उपयोग करूया. कारण पट्टीवर मोठ्या खुणांजवळ १ २ ३ लिहिलेले असून त्यास सेंटीमीटर म्हणतात.<br>एक मीटर : १०० सेमी | पुस्तक, टेबल, फळा, पाट, कापड, साडीची लांबी | विद्यार्थी कृती करून सेंटीमीटर, मीटर समजून घेतील. | मीटर, सेंटीमीटर, विद्यार्थ्यांना समजेल. |
| ५ | | | ०३.७१.०४ | मापन (वस्तुमान) | विद्यार्थ्यांना शिकवितांना वजन हे किलो ग्राम मोजण्याचे प्रमाणित एकक आहे.<br>प्रत्यक्ष वजनाची ओळख करून ठेवूया. १००० ग्रॅम (१ किलो) प्रत्यक्ष दुकानाचा खेळ घेऊन आपण विद्यार्थ्यास अनुभव देऊया. भाजीपाला दुकान व फळांचे दुकान | वजन, वजनकाटा, तराजु, मापन, विविध प्रकारचे वजन काटे उदा. इलेक्ट्रॉनिक काटा, स्प्रिंग काटा. | विद्यार्थी प्रत्यक्ष कृतीतून वजन समजून घेतात. | दैनंदिन जीवनात व्यवहार करीत असतांना कोणती वस्तू किती वजनाची आहे. हे विद्यार्थ्यांना समजते. |
| ६ | | | ०३.७१.०५<br>०३.७१.०६ | मापन (धारकता) | लीटर हे द्रव्य पदार्थ मोजण्याचे प्रमाणित एकक आहे. विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या आकाराचे, उंचीचे भांडे प्रत्यक्ष दाखवून त्यात पाणी भरून कृती करून घेऊया. उदा. दूध वाल्याकडील लीटरचे माप तसेच किराणा दुकान त्याचप्रमाणे पेट्रोल पंप याठिकाणी प्रमाणित मापन वापरली जातात. | गणित पेटीतील मापन वेगवेगळ्या भांड्यांची माप | विद्यार्थी द्रव पदार्थ मोजण्याचे माप समजून घेतात. | लीटर म्हणजे काय? हे कृतीने विद्यार्थ्यांना लवकर समजेल. |

## इयत्ता ३ री (गणित)

| अ.क्र | दिव्यांग प्रवर्ग | अध्ययन शैली | अध्ययन निष्पत्ती क्रमांक | क्षमता | अध्ययन अनुभव | शैक्षणिक साहित्य | अध्ययनाची कृती / प्रतिसाद | अध्ययन अनुभवांची फलनिष्पत्ती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | | | ०३.७१.०७ | संख्याज्ञान व क्रिया (व्याव-हारिक उदाहरणे | विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनात येणाऱ्या उदाहरणांद्वारे व विविध घटनांद्वारे ग्रॅम, किलोग्रॅम यांचा समावेश करून बेरीज व वजाबाकी शिकवूया. उदा. १ किलो वस्तुची किंमत ७० रुपये आहे तर १००रुपये दिल्यावर किती परत येतील याचा गणितीय हिशोब करूया | नाणी, नोटा, प्रासंगिक चित्रे | विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृतीतून व्यवहार समजतो. हिशोबाची सांगड घालता येते | दैनंदिन जीवनात स्वतंत्रपणे वस्तू खरेदी करून किती शिल्लक राहतात? म्हणजेच व्यवहारज्ञान लक्षात राहाते. |
| ८ | | | ०३.७१.०८ | कालमापन (दिन-दर्शिका) | दिनदर्शिका प्रत्यक्ष दाखवून वार, महिना, सुटीचा दिवस, दिनविशेष या सर्वांबद्दल माहिती देवूया. दिनदर्शिकेवरून महिन्याचे दिवस किती? हे सांगणे विद्यार्थ्याला त्याची जन्म तारीख विचारून महिना व तारीख शोधण्यास सांगूया. | दिनदर्शिका, महिना व वार याचे फ्लॅश कार्ड | विद्यार्थी दिनदर्शिकेच्या सहाय्याने बारकावे समजून घेतील. | दिनदर्शिकेत येणारा वार, तारीख, महिना, दिनविशेष यांचे महत्त्व समजून दिनदर्शिकेविषयी माहिती अवगत होईल |
| ९ | | | ०३.७१.०९<br>०३.७१.१०<br>०३.७१.१७<br>०३.७१.१८<br>०३.७१.१९ | कालमापन (वेळ) | प्रत्यक्ष घड्याळ दाखवून सेकंद काटा, मिनिटकाटा, तासकाटा यांची ओळख करून देवू या. तास काटा सर्वात लहान असून तो खाली असतो. त्यानंतर मिनिट काटा हा मोठा असतो आणि सर्वात वर सेकंद काटा असतो. घड्याळात बारा वर सेकंद काटा आहे व तो पूर्ण घरे फिरून पुन्हा बारावर येतो. तेव्हा एक मिनिट होतो. घड्याळातला मिनिटकाटा बारा वर आहे व तो आता पूर्ण घरे फिरून पुन्हा बारावर येतो तेव्हा एक तास होतो. तसेच तास काट्याचे आहे. पूर्ण करून आल्यावर १२ तास होतात. याचा अनुभव त्यांना प्रत्यक्ष देऊयात. भिंतीवरील व हातातील घड्याळाचा सहसंबंध जोडू या. | प्रत्यक्ष घड्याळ, घड्याळाची प्रतिकृती | विद्यार्थ्यांना वेळेचा कालावधी म्हणजे एक तास म्हणजे ६० मिनिट त्याच ६० सेकंद म्हणजे १ मिनिट होय. विद्यार्थ्यांना वेळ समजेल व वेळ सांगता येईल. | विद्यार्थ्यास घड्याळ समजून घेतांना त्यातील तास काटा, मिनीट काटा, सेकंद काटा यातील फरक समजून वेळ समजतो. |

## इयत्ता ३ री (गणित)

| अ.क्र | दिव्यांग प्रवर्ग | अध्ययन शैली | अध्ययन निष्पत्ती क्रमांक | क्षमता | अध्ययन अनुभव | शैक्षणिक साहित्य | अध्ययनाची कृती / प्रतिसाद | अध्ययन अनुभवांची फलनिष्पत्ती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | | | ०३.७१.११ | आकृती-बंध | आकृतीबंध म्हणजे काय? हे विद्यार्थ्यांना सांगतांना एका साचेबंध पद्धतीने क्रिया सतत चालू राहील. उदाहरणाद्वारे स्पष्ट करून देऊयात. उदा. फुल व पाने यातील आकृतीबंध कसे ओळखावे ते बघुयात.<br>उदा. →↑→↑→↑<br>उदा: T B T B T B T B T खेळातील चेक्स दाखवून विद्यार्थ्यांना साचेबद्ध पद्धतीत क्रिया चालू आहे असे समजवूया. | प्रत्यक्ष फूल व पानांचा अनुभव, वेल | विद्यार्थी आकृतीबंध म्हणजे वेल (प्लॅस्टीकचे) काय हे समजून घेतात. | विद्यार्थ्यांना आकृतीबंद समजेल. |
| ११ | | | ०३.७१.१२ | आकृती बंध | आकृतीबंधाचे निरीक्षण करून विस्तार कसा करावा हे सहजतेने शिकूयात. उदा.△○या दोन्ही आकृतीबंधात क्रमांक देऊन सातत्याने चालू देणे वरील आकृत्यांना नंबर द्यावे म्हणजे यातून विद्यार्थ्यांना मांडणी पद्धत समजते त्रिकोण, वर्तुळ यांचा आकार लक्षात येतो व विद्यार्थ्यांस विस्तार कसा करावा हे उदाहरणाद्वारे शिकवूयात. | त्रिकोण चौकोनाचे ठोकळे गणित पेटीचा उपयोग | वर्तुळ, त्रिकोण यांचा आकार लक्षात घेवून विद्यार्थी विस्तार कसा करावा याबाबतचा उदाहरणातून सराव करतात | दोन्ही आकृतीबंधाचे निरीक्षण करून विद्यार्थ्यांना विस्तार व मांडणी यांचे ज्ञान अवगत होते. |





# इयत्ता ४ थी (गणित)

| अ.क्र | दिव्यांग प्रवर्ग | अध्ययन शैली | अध्ययन निष्पत्ती क्रमांक | क्षमता | अध्ययन अनुभव | शैक्षणिक साहित्य | अध्ययनाची कृती / प्रतिसाद | अध्ययन अनुभवांची फलनिष्पत्ती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ‘अ’ गटात येणारे दिव्यांग प्रवर्ग | बहु अध्ययन शैली | ०४.७१.०१ ०४.७१.०५ | संख्याज्ञान व क्रिया (व्याव-हारिक उदाहरणे) | विद्यार्थ्याला दैनंदिन जीवनात संख्येवरील क्रिया कशा वापरात घ्यावयाच्या हे उदाहरणासहीत समजवूया. उदा. दुकानात १० रु.ची चॉकलेट आणावयाची आहे परंतु त्याच्याकडे २० रु. ची नोट आहे तर चॉकलेट घेतल्यावर किती रुपये परत येतील हे ह्या उदाहरणाने समजवून घेवू. प्रत्यक्ष वस्तू दाखवून त्यातील छपाई किंमत १० रु. असून दुसरी वस्तू त्यावरील छपाई केलेली किंमत यांची सांगड घालून देवूयात. घेतलेला अनुभव व प्रत्यक्ष अनुभव याची जुळवा-जुळव करूया.<br>शिक्षक विद्यार्थ्यांना केळीचे चित्र दाखवून एका डझनमध्ये किती केळी येतात हे समजून घेऊया. प्रत्यक्ष केळीचे चित्राने अनुभव देणे. | नाणी-नोटा गणित पेटीतील नाणी व नोटांच्या प्रतिकृती | अध्ययनार्थी प्रत्यक्ष आपल्या अनुभवाने नाणी व नोटा ओळखेल. नाणी व नोटा समजून घेईल. १ रुपये, २ रुपये, ५ रुपये, १० रुपये, २० रुपये यांचे नाणी त्याचप्रमाणे १० रुपये, २० रुपये, ५० रुपये, १०० रुपये, ५०० रुपये, २००० रुपयांच्या नोटा यांचा रंग, आकार, उठावदार नक्षी याद्वारे नाणी व नोटा ओळखेल. दैनंदिन जीवनामध्ये वस्तूंची किंमत व नाणी व नोटा यांचा सहसंबंध लावून व्यवहार करेन. | दैनंदिन जीवनात व्यवहार ज्ञानाची ओळख होते. वस्तूंच्या किंमतीनुसार किती नाणी व नोटा द्यावयाचे आहे. याचे ज्ञान अवगत होते. |
| २. | | | ०४.७१.०२ | गणन व संख्ये वरील क्रिया | ✲ सम म्हणजे सारखी संख्या ज्या संख्येला दोन ने भाग जातो. उद. २, ४, ६, ८... याप्रमाणे त्याला सारखेपणा सुद्धा म्हणतात.<br>✲ विषम संख्या म्हणजे ज्या संख्येला २ ने भाग जात नाही त्या संख्येला विषम संख्या म्हणतात. जसे १, ३, ५, ७, ९, ११........याप्रमाणे सम संख्या व विषम संख्यांचे प्रत्यक्ष अनुभव देवूयात. जसे साहित्याचा वापर करून .<br>उदा. वर्गात विद्यार्थ्यांचा सम संख्येचा गट तयार करायला लावणे त्याचप्रमाणे विषम संख्येचा सुद्धा गट तयार करायला लावणे. या उदाहरणा-वरून संख्यांचे ओळख करून अनुभवाची सांगड देवूयात. सम संख्या व विषम संख्या यांच्या जोड्या लावायला सांगणे. वस्तू व संख्या यांच्या जोड्या लावणे इत्यादी. | लहान ठोकळे, चिंचोक्या, पान, फुले गणित पेटी तसेच गरजेनुरुप शैक्षणिक साहित्य | समसंख्या व विषमसंख्या विद्यार्थ्याला समजावणे, विषम संख्या-विषम संख्येत दोन(२) ही संख्या मिळविल्यास पुढील येणारी संख्या ही विषम संख्या असते.<br>उदा. ३+२=५<br>समसंख्या: समसंख्येत दोन (२) ही संख्या मिळविल्यास पुढील येणारी संख्या ही समसंख्या असते.<br>उदा. ४+२ = ६ | समसंख्या व विषम संख्या यातील फरक लक्षात घेऊन विद्यार्थी त्यानुसार संख्येचे गट तयार करतात. |

| अ.क्र | दिव्यांग प्रवर्ग | अध्ययन शैली | अध्ययन निष्पत्ती क्रमांक | क्षमता | अध्ययन अनुभव | शैक्षणिक साहित्य | अध्ययनाची कृती / प्रतिसाद | अध्ययन अनुभवांची फलनिष्पत्ती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | | | ०४.७१.०३<br>०४.७१.२० | गणन व संख्ये -वरील क्रिया | गुणाकार ही संकल्पना समजून सांगणे, गुणाकार म्हणजे एका अंकाची पुन्हा पुन्हा केलेली बेरीज म्हणजे गुणाकार होय. वस्तूरूपात तसेच अंकांच्या साहाय्याने स्पष्ट करणे. उदा. २+२+२+२+२..सारख्या अंकांची मांडणी, वस्तु रूपात मांडणी, कोणती संख्या किती वेळा लिहिलेली आहे. त्या संख्येला जेवढ्यावेळेस लिहिलेली संख्या आहे. त्यापटीने क्रिया करणे म्हणजे गुणाकार होय. वरील उदाहरणावरून २ x ५ = १० यानुसार करू शकतो. शाब्दिक उदाहरणाद्वारे गुणाकाराची संकल्पना स्पष्ट करून सोडवून घेवूया उदा. तीनशे रुपयाला १ ड्रेस तर ३ विद्यार्थ्यांचे ड्रेस किती रुपयाला मांडणी विद्यार्थीसंख्या शतकस्थानक, दशकस्थानक, एककस्थानक यानुसार सराव करून घेणे. शाब्दिक उदाहरणे देऊया विद्यार्थ्याला गुणाकार संकल्पना समजावून उदा. सोडवून घेऊया. | गोट्या, चहाचे ग्लास, गणित पेटी, मणी माळ, ठोकळे, संख्यांचे चार्ट, चित्र, पान, फुल दगड, आईस्क्रिमच्या काड्या इत्यादी. | शाब्दिक उदाहरणांचा सराव चित्रांद्वारे तसेच खेळण्यांद्वारे, दोन(२) अंकी व तीन (३) अंकी गुणाकाराचा सराव करतील. शाब्दिक उदाहरणांचा सराव करतांना शैक्षणिक साहित्यांचा वापर करतील व त्यातून त्यांचा उत्साह वाढेल. | विविध पद्धती वापरून दोन व तीन अंकी संख्यांचा गुणाकार करतो. |
| ४. | | | ०४.७१.०४ | गुणाकार, भागाकार | भागाकार : भागाकार म्हणजे समान वाटप किंवा समान भाग होय. भाज्य= भागाकार x भाजक + बाकी हे सूत्र भागाकारात वापरायचे असते. या पद्धतीने भागाकार समजून घेऊयात. ÷ चिन्हाची ओळख करून पूर्ण भाग जाणारी उदाहरणे कोणती ते फलकावर किंवा वहीवर लिहिण्यास सांगूया. विद्यार्थ्यांकडून प्रत्यक्ष कृती वस्तूंच्या माध्यमातून करून घेऊयात.<br>उदा. ३ ÷ १२ = ४ पूर्ण भाग जाणारी संख्या त्याचपद्धतीने पूर्ण भाग न जाणारी संख्या जसे उदा. ३ ÷ ११ = ९ शिल्लक बाकी २ यानुसार. | लहान ठोकळे, पान, फुले, गणित पेटी तसेच गरजेनुरुप शैक्षणिक साहित्य | भागाकार ही क्रिया सोडविण्यासाठी विद्यार्थी पाढे पाठ करून व सराव करून उदाहरणे सोडवतील. | शैक्षणिक साहित्यांचा वापर करून सरावांती विद्यार्थी भागाकार कसा करावा व मांडणी लक्षात घेऊन शाब्दिक उदाहरणे सोडवतील. |

| अ.क्र | दिव्यांग प्रवर्ग | अध्ययन शैली | अध्ययन निष्पत्ती क्रमांक | क्षमता | अध्ययन अनुभव | शैक्षणिक साहित्य | अध्ययनाची कृती / प्रतिसाद | अध्ययन अनुभवांची फलनिष्पत्ती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | | | ०४.७१.०६ | पूर्णांक व अपूर्णांक | पूर्ण व अपूर्णांकांची ओळख करून देतांना सर्व प्रथम पूर्ण म्हणजे काय ? हे शिकवितांना दैनंदिन जीवनातील भाकर किंवा पोळी यांचे उदाहरण देऊयात. जसे एक (१), पाऊण, अर्धा व पाव यानुसार तसेच कागदावर एक मोठा चौकोन काढून त्याचे कोनाचे चार समान भाग करून एक भाग (पाव) रंगविणे, अशा पद्धतीने अर्धा, पाऊण यांची प्रत्यक्ष कृती करून घेऊयात. | पेपर डीश, भाकर, पोळी, चौकोनी फळी तसेच फरशी (चार भाग केलेले) | विद्यार्थी प्रत्यक्ष वस्तूंचा वापर करून त्याचे चार भाग करतील व प्रत्येक भागाला काय म्हणतात ते समजून घेतील व जोडतील. | पूर्ण पासून अपूर्ण ही क्रिया विद्यार्थ्यांना अवगत होऊन दैनंदिन जीवनामध्ये क्रिया करतील जसे कागदाची घडी, भाकरीचे किंवा पोळीचे तुकडे याप्रमाणे |
| ६ | | | ०४.७१.०७<br>०४.७१.०८<br>०४.७१.०९ | आकार –मान वर्तुळ, त्रिज्या, व्यास | दैनंदिन व्यवहारात वापरात येणाऱ्या वस्तूंचे आकार लक्षात घेऊन त्यास असणाऱ्या आकारांची नावे संबोधण्यास मदत करणे.<br>१) बसण्याचे पाठ, २) फळा, ३) टेबल हे आयताकृती आहेत. ४) पृथ्वीची प्रतिकृती-गोल उदा. चेंडू, ५) सिलेंडर-दंडगोल आकार<br>त्रिज्या: वर्तुळाच्या कोणत्याही केंद्रातून जाऊन परिघावरील बिंदुला मिळणाऱ्या रेषाखंडाला त्रिज्या म्हणतात. व्यास: जीवा वर्तुळाच्या केंद्रातून जाते त्यास व्यास असे म्हणतात. | पृथ्वीची प्रतिकृती, चेंडू, बसण्याचे पाट, प्रत्यक्ष टेबल, कंपास पेटी, गणित पेटीतील साहित्य | विद्याथी घरातील वेगवेगळ्या आकाराच्या वस्तूंची नावे व आकार सांगतात व कपास पेन्सीलच्या साहाय्याने आकार वहीवर अथवा फळ्यावर काढून दाखवतील. वर्तुळ काढून वर्तुळाचे केंद्र, त्रिज्या व व्यास ओळखतील. | विद्यार्थी घरातील व शाळेतील वेगवेगळ्या आकाराच्या वस्तु ओळखतात व वर्तुळातील केंद्रबिंदू त्रिज्या व व्यास पेन्सिलने दाखवतात. |
| ७. | | | ०४.७१.१०<br>०४.७१.११ | भौमितिक आकार (इष्टिकाचिती व घडणी | विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष इष्टिकाचिती हा घटक समजविण्यासाठी प्रत्यक्ष वस्तूंचा वापर करून त्याची कडा, बाजू, पृष्ठभाग, समजावून सांगूयात.<br>उदा. आगपेटी, खोका, क्युब. | आगपेटी, खोका, क्यूब | विद्यार्थी आता कागद किंवा कार्डशीट पेपरचा वापर करून स्वत: घडी पद्धतीने इष्टिकाचिती वस्तू तयार करतील. | विद्यार्थी स्वत: कृती करून इष्टिकाचिती म्हणजे काय हे अर्थपूर्ण ओळखतात. |

| अ.क्र | दिव्यांग प्रवर्ग | अध्ययन शैली | अध्ययन निष्पत्ती क्रमांक | क्षमता | अध्ययन अनुभव | शैक्षणिक साहित्य | अध्ययनाची कृती / प्रतिसाद | अध्ययन अनुभवांची फलनिष्पत्ती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८. | | | ०४.७१.१२ | भौमितिक आकार | शिक्षक वर्गात विद्यार्थ्यांना कोन, संज्ञा शिकवतांना कोनाचे प्रकार उदाहरणाद्वारे समजावून देतात. | दप्तरातील वस्तू सभोवतालची उदाहरणे | विद्यार्थी कोन मापकाच्या सहाय्याने विविध कोनाचे आकार स्वत: काढतील. | विद्यार्थी कोन ही संज्ञा समजून घेतात. |
| ९. | | | ०४.७१.१३<br>०४.७१.१४<br>०४.७१.१५ | मापन | सेंटीमीटर, मीटर, किलोमीटर हे सेमी. मी. मिली असे लिहितात. १ सेमी = १० मिलिमीटर. विद्याथी मित्रांनो आपण मोजमाप पटट्रीच्या साहाय्याने वस्तूंचे मापन करूयात. उदा.पेन्सिल, पेन, रबर, कंपासपेटी व मीटरपट्टीच्या सहाय्याने देखील वस्तुंचे मापन करूयात. उदा. बेंच, फळा, दरवाजा, कपाट त्यासाठी आपल्याला मापन समजून घेण्यासाठी जसे की, १ सेंटीमीटर = १० मिलीमीटर १ व २ या अंकांच्यामधील बारीक रेषा मिलीमीटरच्या असतात. १, २, ३ ह्या सेमीच्या आहेत. १०० सेंटीमीटर = १ मीटर, १ किलोमीटर = १००० मीटर. बसच्या सहाय्याने प्रवास केला असता. आपल्याला किलोमीटरची खूण दिसते व गावाचे नाव. उदा. गावाचे नाव व किलोमीटर. विद्यार्थी मित्रांनो आपण दुकानात वस्तू घेण्यासाठी जातो. त्यावेळेला त्यांच्याजवळ खालीलप्रकारे मापन करण्यासाठी वजने असतात. उदा. २० ग्रॅम, ५० ग्रम, १०० ग्रॅम, २०० ग्रॅम, ५०० ग्रॅम, १ किलो, २ किलो, ५ किलो असे असतात. दुधवाल्याजवळ दूध घेण्यासाठी गेल्यावर त्यावेळेला दूध लिटरमध्ये देत असतो. अर्धा लिटर दूध हे ५०० मिलीलीटरने दिले जाते. हे कृती करून दाखविणे. ५०० ग्रॅमच्या वस्तूच्या पाकीटाच्या सहाय्याने विविध वस्तू तराजूच्या | मीटरपट्टी, फुलपट्टी, पेन, पेन्सील इ. दुकानदाराकडील वजनाची वेगवेगळी मापे २० ग्रॅम, ५० ग्रॅम, १०० ग्रॅम, २०० ग्रॅम, ५०० ग्रॅम, १ किलो, २ किलो, ५ किलो असे असतात. मापन १ लिटर, ५०० मिलीलिटर, २०० मिलीलिटर, १०० मिलीलिटर, ५० मिलीलिटर | विद्यार्थी फुटपट्टीचा वापर करून जवळ असलेल्या वस्तू उदा. पेन्सिल, पेन, कंपास यांची लांबी उंची जाडी मोजण्याचा प्रयत्न दुकानात गेल्यावर त्यांना येणारे अनुभव विद्यार्थी वर्गात सांगतील व त्यावर चर्चा करतील व गणितीय क्रिया जसे बेरीज, वजाबाकी, गुणाकार व भागाकार करतील. शाब्दिक उदाहरणांचा सराव करतील लिटर, किलोग्रॅमचे उदाहरणे सोडवतील. | विद्यार्थी सेमी व मीटर ओळखतात व कंपासपेटीत असलेल्या साहित्यांना सेमीच्या साहाय्याने मोजतात. विद्यार्थी दैनंदिन जीवनात येणारे प्रसंग सांगतात व प्रत्यक्ष पाहिलेले वजन आणि पैसे यांचा संबंध लावतात शाब्दिक उदाहरणांद्वारे गणितीय क्रिया करतील. |

| अ.क्र | दिव्यांग प्रवर्ग | अध्ययन शैली | अध्ययन निष्पत्ती क्रमांक | क्षमता | अध्ययन अनुभव | शैक्षणिक साहित्य | अध्ययनाची कृती / प्रतिसाद | अध्ययन अनुभवांची फलनिष्पत्ती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | सहाय्याने मोजणे. १ लिटर माप घेऊन त्यातून दूध, पाणी, मोजून दाखविणे जसे वस्तू कमी अधिक असतील तर त्यात बेरीज, वजाबाकी, गुणाकार करून समजावणे.<br>उदा. ४ किलो तांदुळ मोजतांना १ किलो ग्रॅम वजन घेतल्यास १ x ४ = ४ वेळा Kg किलोने मोजावे लागेल. | | | |
| १०. | | | ०४.७१.१६<br>०४.७१.१७<br>०४.७१.१८ | संख्यां-वरील क्रिया (गुणाकार) | गुणाकाराची क्रिया आकृतीबंधाच्या सहाय्याने समजून घेऊया.<br>हजार शतक दशक एकक<br>याद्वारे संख्या लिहून क्रिया करून घेऊया.<br>त्याच पद्धतीने भागाकाराची क्रिया आकृतीबंधाच्या सहाय्याने समजून घेऊया | विद्यार्थी पाढ्यांच्या सहाय्याने व आकृतीबंधात गुणाकाराची क्रिया करतील. तसेच भागाकारात देखील पाढ्यांद्वारे समान वाटणी करून आकृतीबंधात भागाकाराची क्रिया करतील. | विद्यार्थी पाढ्यांच्या सहाय्याने काळजीपूर्वक आकृतीबंधात (खात्यांत) गुणाकाराची तसेच भागाकाराची क्रिया करून उदाहरणे सोडवितात. | विद्यार्थी पाढ्यांच्या सहाय्याने काळजीपूर्वक आकृतीबंधात (खात्यांत) गुणाकाराची तसेच भागाकाराची क्रिया करून उदाहरणे सोडवितात. |
| ११. | | | ०४.७१.२० | आकृतीबंध | ∆○○∆○○∆○○--○○∆--चित्र पाहण्यास सांगून त्रिकोणानंतर दोन गोल असा क्रम लावण्यास सांगूया. रिकाम्या रकान्यात काय येईल ते भरण्यास सांगूया. रांगोळी काढत असतांना कोणत्या प्रकारचा आकार काढून झाल्यावर कोणता आकार येतो ते प्रत्यक्ष कृतीतून शिकवूया. | त्रिकोण, चौकोन, गोलचे ठोकळे संख्याकार्ड, शब्दकार्ड | विद्यार्थी त्रिकोण, चौकोन, रांगोळीच्या सहाय्याने चित्रलेख पूर्ण करतील. | विद्यार्थी चित्रांवरून व चित्रलेखनावरून तसेच रांगोळी काढतांना अनुमान लावतात. पुढील चित्रात कोणते चित्र येईल किंवा रांगोळी येईल ते ओळखतात. |

# इयत्ता ५ वी (गणित)

| अ.क्र | दिव्यांग प्रवर्ग | अध्ययन शैली | अध्ययन निषत्ती क्रमांक | क्षमता | अध्ययन अनुभव | शैक्षणिक साहित्य | अध्ययनाची कृती / प्रतिसाद | अध्ययन अनुभवांची फलनिष्पत्ती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | 'अ' गटात येणारे दिव्यांग प्रवर्ग | बहु अध्ययन शैली | ०५.७१.०१ | संख्या–वाचन, गणन, संख्या लेखन | विद्यार्थ्यांना १००० पेक्षा जास्त किंमतीच्या संख्या फळ्यावर ठळक अक्षरात लिहून त्याचे वाचन करून घेण्याची संधी उपलब्ध करून देऊया.<br>स्थानिक किंमतीची ओळख स्पष्ट करून त्यानुसार विद्यार्थ्यांना नियमित सराव करून घेऊया.<br>वजाबाकी, बेरीज, गुणाकार व भागाकार हे विद्यार्थ्यांची क्षमता व गरज ओळखून त्या अनुषंगाने उदाहरणे देऊन पडताळणी करून घेऊया. | फ्लॅशकार्ड आवश्यक शैक्षणिक साहित्य तसेच गणित पेटी | विद्यार्थी सरावाने १००० पेक्षा जास्त किंमतीच्या संख्यांचे वाचन करतील.<br>सरावामुळे विद्यार्थी स्थानिक किंमत अचूक ओळखतात.<br>विद्यार्थी आपल्या क्षमतेनुसार व आवश्यकतेनुसार गणितीय क्रिया तोंडी व लिखित स्वरूपात करतील. | विद्यार्थी १०००पेक्षा जास्त किंमतीच्या संख्यांचे वाचन करतात.<br>विद्यार्थ्यांना स्थानिक किंमतीचे अचूक ज्ञान होते.<br>गणितीय क्रिया (बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार) स्वत: करतात. |
| २. | | | ०५.७१.०२ | संख्या वर्गीकरण | विद्यार्थ्यांना सोपी उदाहरणे देऊन मूळ संख्यांची ओळख करून देऊया. उदा. १, ५, ७, ११, १३, १७, २१ इत्यादी<br>विद्यार्थ्यांना सोपी उदाहरणे देऊन सहमूळ संख्यांची ओळख करून देऊया.<br>उदा. २, ४, ६, ९, १०, १२, १४, १६ इत्यादी<br>विद्यार्थ्यांना नैसर्गिक संख्यांचे मुळ संख्या व सहमुळ संख्या यामध्ये वर्गीकरण करण्याचा सराव करून घेऊया. | गणित पेटी, मणी, गोट्या, पान, फूल, चिंचोक्या, खडे इ. | विद्यार्थी मूळ संख्या ओळखतील<br>विद्यार्थी स्वत: सहमुळ संख्या ओळखतात. मण्यांच्या किंवा गोट्यांच्या किंवा इतर साहित्यांच्या मदतीने विद्यार्थी मूळ संख्या व सहमुळ संख्यांचे स्वत: वर्गीकरण करतील. | विद्यार्थी मूळ संख्या व सहमुळ संख्या यांचे स्वत: वर्गीकरण करतात व उदाहरणे देतात. |
| ३. | | | ०५.७१.०३ | पूर्णांक व अपू–र्णांकाची ओळख | शिक्षक विद्यार्थ्यांना विविध उदाहरणाद्वारे व कृतीद्वारे समतुल्य पूर्णांक ही संकल्पना स्पष्ट करून दिल्याने विद्यार्थी स्वत: पूर्णांक व अपूर्णांक यातील फरक समजून घेतात. | कागदाची घडी घालणे, भाकर, पोळी. | विद्यार्थी पूर्णांक ही संकल्पना समजून घेतील उदा.● ⊕ ◖<br>यानुसार कागदाची घडी घालून स्वत: सराव करतील. | विद्यार्थी पूर्णांक व अपूर्णांक यातील फरक ओळखतात. |

## इयत्ता ५ वी (गणित)

| अ.क्र | दिव्यांग प्रवर्ग | अध्ययन शैली | अध्ययन निष्पत्ती क्रमांक | क्षमता | अध्ययन अनुभव | शैक्षणिक साहित्य | अध्ययनाची कृती / प्रतिसाद | अध्ययन अनुभवांची फलनिष्पत्ती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | | | ०५.७१.०४ | कोन व आकार | शिक्षक वर्गात विद्यार्थ्यांना कोन, संज्ञा शिकवतांना कोनाचे प्रकार उदाहरणाद्वारे समजावून देतात. | दफ्तरातील वस्तू सभोवतालची उदाहरणे | विद्यार्थी कोन मापकाच्या सहाय्याने विविध कोनाचे आकार स्वत: काढतील | विद्यार्थी कोन ही संज्ञा समजून घेतात |
| ५. | | | ०५.७१.०५<br>०५.७१.०६ | एकक रूपांतरण | मोठ्या एककाचे लहान एककात रूपांतरण करण्यासाठी विद्यार्थ्यांना निरीक्षणाद्वारे संधी उपलब्ध करून देऊ या. यासाठी दैनंदिन जीवनातील उदाहरणे देऊया. तांब्या व बादली यातील धारकता प्रमाण ओळखतील. | गणित पेटी, मीटरपट्टी, टेप, बादली, डब्बा, औषध मोजण्याचे माप. | विद्यार्थी दैनंदिन जीवनातील एककाची उदाहरणे देतील. उदा. मीटर, से.मी., लिटर, मी.मीटर इत्यादी.<br>विद्यार्थी कृतीतून लहान एककाचे मोठ्या एककात रूपांतरण करतील. | विद्यार्थी मोठ्या एककाचे रूपांतरण करतात. आकारमान ही संकल्पना ओळखतात. |
| ६. | | | ०५.७१.०७ | भौमितीक आकार (इष्टिकाचिती व घडणी | विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष इष्टिकाचिती हा घटक समजाविण्यासाठी प्रत्यक्ष वस्तूंचा वापर करून त्याची कडा, बाजू, पृष्ठभाग, समजावून सांगूयात. उदा. आगपेटी, खोका, क्युब | आगपेटी,खोका, क्युब | विद्यार्थी कागद किंवा कार्डशींट पेपरचा वापर करून स्वत: घडी पद्धतीने इष्टिकाचिती वस्तू तयार करतील. | विद्यार्थी स्वत: कृती करून इष्टिकाचिती म्हणजे काय हे अर्थपूर्ण ओळखतात. |
| ७. | | | ०५.७१.०८ | मापन | विद्यार्थ्यांना व्यवहारी ज्ञान समजण्यासाठी वस्तूंची किंमत एकूण खर्च लागणारे पैसे आणि शिल्लक रक्कम याचा अंदाज लावण्यासाठी स्वानुभव देऊया. | प्रत्यक्ष अनुभव, नाट्यकीकरण | विद्यार्थी स्वत: स्वयंम प्रेरणेने वस्तू खरेदी करीत असतांना त्याची किंमत, एकूण खर्च व शिल्लक राहिलेली रक्कम याचा अनुभव घेतात. उदा. दुकानावर जातांना ५० रुपयाची किंवा १०० रुपयाची नोट घेऊन गेल्यावर दुकानदाराकडून १० रुपयाचा बिस्कीटचा पुडा घेतल्यावर एकूण किती रूपये शिल्लक राहतात? याची गोळा बेरीज करतील | विद्यार्थ्यांना पैशांची किंमत समजेल व मिळविणे, कमी करणे, गुणने या क्रिया आत्मसात करतो. व्यावहारिक जीवनात अनुभव घेतात. |

# इयत्ता ५ वी (गणित)

| अ.क्र | दिव्यांग प्रवर्ग | अध्ययन शैली | अध्ययन निष्पत्ती क्रमांक | क्षमता | अध्ययन अनुभव | शैक्षणिक साहित्य | अध्ययनाची कृती / प्रतिसाद | अध्ययन अनुभवांची फलनिष्पत्ती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | | | ०५.७१.०९ | आकृती बंध | विद्यार्थ्यांना आकृतीबंध शिकवितांना मांडणी स्वरूपात शिकू या. त्रिकोणावर ठिपके दिल्यावर विद्यार्थ्यांकडून त्या मोजून घेऊया. तसेच चौरस आकृती बंधातून संख्या (चेक्सच्या आधारे) मोजता येते. उदा.चौरसाची आकृती काढून त्यावरील संख्या विद्यार्थ्यांकडून मोजून घेऊया. | कंपासपेटी, गणित पेटी | शिकविलेल्या आकृतीबंधातील त्रिकोणीची संख्या व चौकोनीची संख्या विद्यार्थी सहजपणे काढू शकतात. | विद्यार्थ्यांना त्रिकोणीची संख्या व चौकोणीची संख्या विषयी माहितीचे ज्ञात होते. |
| ९. | | | ०५.७१.१० | माहितीचे व्यव-स्थापन (चित्र-लेख) | विद्यार्थ्यांना सांख्यिकीय माहिती चटकन समजावी याकरिता चित्रलेखाचा वापर करू शकतो. | चित्राचे कार्ड | विविध उदाहरणे घेऊन त्यानुसार समजेल असा सोपा चित्रलेख विद्यार्थी काढतात. | विद्यार्थी चित्र व संख्या यांचा सह संबंध जोडून माहिती संकलित करतो. |
| १०. | | | ०५.७१.११ | आयता-कृती. वस्तुची परिमिती व क्षेत्रफळ | परिसरातील आयताकृती वस्तूंची परिमिती म्हणजे बंदिस्त आकृतीच्या सर्व बाजूंच्या लांबीची बेरीज, उदा.पुस्तक, कंपासपेटी, मोबाईल, खाऊचा डबा, सर्व आयताकृती वस्तु, वर्गखोली. | पुस्तक, कंपास, वर्गखोली | विद्यार्थी परिसरातील आयताकृती वस्तूंचे परिमिती व क्षेत्रफळ काढतील | विद्यार्थी परिमिती व क्षेत्रफळ याबाबत अभ्यास करतील. |
| ११. | | | ०५.७१.१२ | संख्या-वरील क्रिया | शैक्षणिक साहित्यांचा वापर करून बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार या क्रिया विद्यार्थ्यांना शिकवूया. | गणित पेटी, मणी | विद्यार्थी परिसरातील वस्तू, (मणी, गोट्या, पाने, चिंचोक्या, फुले, खडे) या वस्तूंचा वापर करून या चारही क्रिया करतील. | विद्यार्थी बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार या क्रिया करतील. |








# समावेशित शिक्षण सक्षमीकरण विभाग

## जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,
## धुळे